रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३५१
www.ramprahar.com
◆ गुरुवार, ९ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

बोरघाटात पडलेले झाड हटवताना एकाचा मृत्यू/२
सुधागडच्या धोंडसे येथे दरड कोसळली/५
विम्बल्डनमध्ये जोकोविचची सेमीफायनलमध्ये धडक/८

## सीमाप्रश्नी बैठक; कोर्टात अधिक ताकदीने लढण्याचा निर्धार



**मुंबई :** विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. ८) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत उच्चाधिकार समितीची बैठक झाली. या बैठकीला ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार आणि नारायण राणे हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, शंभूराज देसाई, इतर नेते, आमदार व अन्य मान्यवर हजर होते. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद न्यायालयात प्रलंबित आहे. यासंदर्भात उच्चाधिकार समितीची विशेष बैठक विधिमंडळाच्या मंत्रिमंडळ बैठक सभागृहात पार पडली. या बैठकीत सीमाप्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या खटल्यात महाराष्ट्राची बाजू अधिक भक्कम व प्रभावीपणे मांडण्याचे निश्चित करण्यात आले.

# महाराष्ट्राला बदनाम करू नका!

## मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना सुनावले खडे बोल

**मुंबई : प्रतिनिधी**

देवेंद्र फडणवीसला हव्या तेवढ्या शिव्या द्या, मला त्याची सवय झाली असून मी आता 'शिव्याप्रूफ' झालो आहे; परंतु आपल्याच राज्याची बदनामी करून इथल्या इंजिनीअरिंग मार्व्हल ठरलेल्या प्रकल्पांवर चिखलफेक करू नका. मला बदनाम करा, पण महाराष्ट्राला बदनाम करू नका, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना बुधवारी (दि.८) विधानसभेत खडे बोल सुनावले.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील 'कनेक्टिंग लिंक' प्रकल्पावर झालेल्या दरड कोसळण्याच्या घटनेवरून विरोधकांनी केलेल्या टीकेचा समाचार घेताना "एक कोटी खोटारडे लोक मेल्यानंतर हे लोक पैदा झाले असतील, त्यांना खोटे बोलायला लाजही वाटत नाही," असा घणाघाती हल्लाबोल मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केला. त्याचवेळी मुंबईसाठी १३ हजार कोटींच्या एकात्मिक पूरनियंत्रण यंत्रणेचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवल्याची माहिती त्यांनी दिली.

मुंबई आणि महानगर परिसरात झालेला मुसळधार पाऊस, उद्‌भवलेली परिस्थिती आणि मुंबई-पुणे मिसिंग लिंकवर दरड कोसळल्यामुळे निर्माण झालेला गदारोळ यावर विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या चर्चेला मुख्यमंत्री विधानसभेत उत्तर देत होते. गेल्या काही दिवसांत मुंबईत झालेल्या अभूतपूर्व पावसाची आकडेवारी मांडताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मुंबईच्या एकूण पावसाळ्याच्या तब्बल ४१ ते ४२ टक्के पाऊस या सहा दिवसांत पडला असून तो



दिल्लीच्या एकूण पावसाळ्यापेक्षा ११७ टक्के आणि पुण्याच्या पावसाळ्यापेक्षा ११३ टक्के जास्त आहे. अशातच ५० ते ५५ किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे आणि त्यातच आलेली चार मीटरची हायटाईड (भरती) अशा तिहेरी संकटामुळे मुंबईत झाडे उन्मळून पडली आणि अनेक दुर्घटना घडल्या. या दुर्घटनांमधील नागरिकांच्या मृत्यूबाबत त्यांनी तीव्र दुःख व्यक्त करत प्रशासनाला आणि मुंबई महापालिकेला आवश्यक ते निर्देश दिले असल्याचे स्पष्ट केले.

कनेक्टिंग लिंकवर विरोधकांकडून होणाऱ्या अवाजवी टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाचा इतिहासच सभागृहासमोर मांडला. ते म्हणाले, आघाडी सरकारच्या काळात या मिसिंग लिंकचा प्रस्ताव तयार झाला होता, मात्र तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दोन पानांची नोट लिहून तब्बल १४ कारणे पुढे करत हा प्रकल्प अशक्य असल्याचे सांगितले आणि त्याची फाईल कायमची बंद करून टाकली होती, पण महायुती सरकारमध्ये ती हिंमत होती म्हणून आम्ही अधिकारी आणि तज्ज्ञांशी चर्चा करून हा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्याचा धाडसी निर्णय घेतला. आज आम्ही हा प्रकल्प पूर्ण करून जगातला सगळ्यात रूंद बोगदा आणि भारतातला सर्वात उंच केबल स्ट्रेड ब्रिज तयार करून दाखवला आहे. **(पान २ वर..)**

# रायगडात पावसाचे ११ बळी

## ५५ ठिकाणी दरडी कोसळल्या, ८८९ घरांचे नुकसान

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याला सलग आठ दिवस मुसळधार पावसाने झोडपून काढले. पावसामुळे जिल्ह्यात ११ जणांचा बळी गेला. ५५ ठिकाणी दरडी कोसळल्या. ८८९ घरांचे तसेच ४२ रस्ते व पुलांचे नुकसान झाले, तर ४० गावांमधील १७७८ जणांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.

जिल्ह्यात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे ११ जणांचा मृत्यू झाला आहे. पनवेल तालुक्यात चार, कर्जत तीन, महाड दोन, तर अलिबाग व तळा तालुक्यात प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला. याशिवाय तीन जण जखमी झाले आहेत.

५५ ठिकाणी दरडी कोसळल्या. ५१ घरे पूर्णतः कोसळली. ६३१ पक्क्या घरांचे व २०७ कच्च्या घरांचे अंशतः नुकसान झाले. एकूण ८८८ घरांचे नुकसान झाले. २८० गावांतील



४९१३ घरांमध्ये पाणी शिरले होते. ४० गावांमधील ४४७ कुटुंबांतील १७७८ जणांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे.

७१ गोठ्यांचे नुकसान झाले. ३३ जनावरे, ४२३६ कोंबड्या मृत्युमुखी पडल्या. २९ सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान झाले. ४२ रस्ते-पुलांना हानी पोहचली तसेच २०३ दुकानांचे नुकसान झाले आहे.

मंगळवारी पावसाचा जोर कमी झाला होता, परंतु बुधवारी पहाटे पावसाचा जोर पुन्हा वाढला. दुपारनंतर पावसाने विश्रांती घेतली, पण वातावरण ढगाळ होते.

### धरणक्षेत्रातही दमदार पाऊस

धरण क्षेत्रातदेखील चांगला पाऊस पडत असून लघुपाटबंधारे विभागाची २८पैकी १९ धरणे शंभर टक्के भरली आहेत. २८ धरणांची ६८.५१५ दशलक्ष घनमीटर पाणीसाठ्याची क्षमता आहे. सध्या या सर्व धरणांमध्ये एकूण ५९.९१३ दशलक्ष घटमीटर पाणीसाठा आहे. एकूण पाणीसाठ्याच्या ८७.४५ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. फणसाड (मुरूड), वावे (तळा), सुतारवाडी (रोहा), आंबेघर (पेण), कोंडगाव, घोटवडे, कवेळे, उन्हेरे (सर्व सुधागड), कुडकी (श्रीवर्धन), पाभरे व संदेरी (म्हसळा), वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे (सर्व महाड), भिलवले, कलोते-मोकाशी, डोणवत (सर्व खालापूर), मोर्बे (पनवेल) ही धरणे शंभर टक्के भरली आहेत.

# राज्यातील आदिवासी बांधवांना मिळणार सातबारा

## महसूलमंत्र्यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील आदिवासी आणि पारंपरिक वननिवासी बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारा अत्यंत क्रांतिकारक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. वनहक्क कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनींवर आता आदिवासींना स्वतंत्र सातबारा उतारा आणि गाव नमुना १२ ई लागू करण्यात आला आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि. ८) विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांत केली. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील दोन लाखांपेक्षा जास्त आदिवासी कुटुंबांच्या हक्काचा मार्ग मोकळा झाला आहे.

महसूलमंत्री बावनकुळे निवेदन करताना म्हणाले, आतापर्यंत वनपट्टा मंजूर झाल्यानंतर आदिवासी बांधवांची नावे



सातबारा उताऱ्यावरील केवळ 'इतर हक्क' या सदरात नोंदवली जात होती, तर मुख्य मालकी हक्काच्या जागी 'महाराष्ट्र शासन वने' असा उल्लेख असायचा. या तांत्रिक अडचणीमुळे आदिवासी शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळण्यात, बँकांकडून कृषी पीक कर्ज घेण्यात, कृषी विभागाच्या योजनांचा लाभ उठवण्यात आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी नुकसानभरपाई मिळवण्यात व्यावहारिक अडचणी येत होत्या. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली होती.

समितीच्या शिफारशीनुसार सरकारने विशेष बाब म्हणून वनपट्टाधारकांसाठी स्वतंत्र सातबारा नमुना ७ ई आणि गाव नमुना १२ ई तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. गाव नमुना ७ ई मध्ये थेट संबंधित वनपट्टाधारकाची नोंद केली जाईल. गाव नमुना १२ ई मध्ये संबंधित जमिनीवरील पिकांची नोंद घेतली जाईल. या नवीन निर्णयामुळे आदिवासी बांधवांना शासकीय सुविधांचा लाभ सुलभतेने घेता येणार आहे.

## पुण्याच्या मोशीत इमारत कोसळली

**पुणे : प्रतिनिधी**

मुसळधार पावसात पुण्यामध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. पिंपरी-चिंचवडमधील मोशी कचरा डेपोजवळ असलेल्या वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाची इमारत बुधवारी (दि.८) दुपारी कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

या दुर्घटनेत किमान १४ कर्मचारी अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कर्मचाऱ्यांचा शोध घेण्यासाठी बचाव पथके शर्थीचे प्रयत्न करीत आहेत.

## सुट्टीच्या 'फेक' पत्राने उडवला गोंधळ

**पाली : प्रतिनिधी**




रायगड जिल्ह्यात सोशल मीडियावर एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सही-शिक्क्यासह बुधवारी (दि. ८) शाळांना सुट्टी घोषित करण्यात आल्याचे एक खोटे (फेक) पत्र समाजमाध्यमांवर व्हायरल झाले. त्यामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये संभ्रम आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

या पत्रात अतिवृष्टीचा इशारा देऊन ८ जुलै रोजी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केल्याचे नमूद करण्यात आले होते. पत्रावर जिल्हाधिकाऱ्यांची हुबेहूब सही आणि शिक्काही वापरण्यात आला होता. हे पत्र पाहताच अनेक पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवायचे की नाही या विवंचनेत पडले, तर बहुतांश मुख्याध्यापक आणि शिक्षकांनाही नक्की सुट्टी आहे की नाही हे समजत नव्हते. अखेर सकाळी पावणेआठ वाजता रायगड आपत्ती नियंत्रण कक्षाच्या अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप चॅनलवरून याबाबत स्पष्टीकरण जारी करण्यात आले. यानंतर गोंधळावर पडदा पडला.

## निवडक

### एक्स्प्रेस वेवर अपघातात दोघांचा मृत्यू, एक जण गंभीर

**खालापूर :** मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर खालापूर पोलीस ठाणे क्षेत्रातील धामणी गावच्या हद्दीत बुधवारी (दि.८) भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने समोर जाणाऱ्या ट्रकला पाठीमागून धडक दिली. या अपघातात कारमधील चारपैकी दोघांचा जागीच मृत्यू, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. जखमी व्यक्तीला एमजीएम रुग्णालय कळंबोली येथे दाखल करण्यात आले असून पोलिसांकडून मृतांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.

### पाताळगंगा नदीपात्रात गॅस सिलिंडर आले वाहून

**रसायनी :** येथील पाताळगंगा नदीपात्रात गॅस सिलिंडरच्या सुमारे तीन हजार टाक्या वाहून आल्याने बुधवारी (दि.८) खळबळ उडाली. चावणे येथील पाताळगंगा एमआयडीसीमधील एचपीसीएल कंपनीच्या बॉटलिंग प्लांटमधून हे गॅस सिलिंडर वाहून आल्याचे वृत्त आहे. पुराचे पाणी कंपनीच्या आवारात शिरल्याने हे सर्व सिलिंडर पाताळगंगा नदीपात्रात पाण्याच्या प्रवाहासोबत वाहून गेले. स्थानिकांची हे सिलिंडर अडवण्यासाठी झुंबड उडाली होती. जिल्हा प्रशासनाकडून या घटनेची चौकशी सुरू आहे.

## कर्जतच्या आंबिवलीत बंधारा फुटला

### भातशेतीचे नुकसान

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आंबिवली गावाजवळील ३८ वर्षे जुना बंधारा बुधवारी (दि.८) सकाळी फुटला. या घटनेमुळे परिसरातील भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे.



आंबिवली गाव टेकडीवर वसलेले असल्याने पाणी गावात किंवा घरांमध्ये शिरले नाही, मात्र वेगाने ते शेतात शिरल्याने उभी पिके वाहून जाऊन स्थानिकांना फटका बसला आहे. याशिवाय एका शेतकऱ्याची पोल्ट्री वाहून गेली आहे तसेच आसवले यांच्या प्रकल्पातील एक बंगला पाण्याखाली गेला.

बंधारा फुटल्यानंतर मोग्रज, रजपे आणि जांबरुंग ग्रामपंचायतीतील गावांचा रस्ते संपर्क काही काळ तुटला होता. प्रशासनाने जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यावर साचलेला मलबा हटवून वाहतूक पूर्ववत केली.

घटनेची माहिती मिळताच तहसीलदार धनंजय जाधव, गटविकास अधिकारी सुशांत पाटील, पोलीस निरीक्षक उमेश पाटील, लघुपाटबंधारे विभागाचे उपअभियंता बाहुबली हुक्केरी, शाखा अभियंता सुजित धनगर, पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

यावेळी तहसीलदार धनंजय जाधव यांनी बंधारा फुटल्यामुळे पोल्ट्री व शेतीचे नुकसान झाले आहे. पाऊस थांबल्यानंतर पंचनामा करून शासकीय योजनांमधून मदत मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल तसेच शेजारील सोलनपाडा पाझर तलावाचीही पाहणी करण्यात आली असून सुरक्षिततेच्या दृष्टीने तेथील नागरिकांचे आवश्यकतेनुसार स्थलांतर करण्यात येईल, असे स्पष्ट केले.



## महापौर नितीन पाटील यांचा कळंबोलीत पाहणी दौरा

■ अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना करण्याच्या सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात काही दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी बुधवारी (दि.८) कळंबोली परिसराचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी शहरातील विविध सखल आणि पाणी साचलेल्या भागांची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

या पाहणी दौऱ्यावेळी महापौरांसोबत उपमहापौर प्रमिला पाटील, नगरसेवक अमर पाटील, रामदास शेवाळे, नगरसेविका बायजा बबन बारगजे, सायली तुकाराम सरक, भाजपचे जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

पावसाचे पाणी साचून नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी महापौर पाटील यांनी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आणि पाण्याचा निचरा वेगाने करण्याच्या सूचना दिल्या.

## पाण्याच्या प्रवाहात तरुण गेला वाहून

**नवीन पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील धोदाणी येथे दोन तरुणांचा गाढी नदीत वाहून जात मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच भेकरेवाडी, शिरवली गाव परिसरात मित्रांसोबत फिरायला गेलेला तरुण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याची घटना मंगळवारी घडली. मयूर पाटील (रा. कळंबोली, मूळचा धुळे) असे या तरुणाचे नाव असून त्याचा नदीपात्रात शोध घेतला जात आहे.

मयूर हा पाच-सहा मित्रांसोबत भेकरेवाडी, शिरवली गाव परिसरात फिरण्यासाठी आला होता. यावेळी ते पाण्यात पोहण्यासाठी उतरले. दरम्यान, मयूरचा पाय घसरला आणि तो पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर पनवेल तालुका पोलीस घटनास्थळी दाखल झाले, मात्र जोरदार पावसात व वेगवान पाण्याच्या प्रवाहामुळे शोधमोहिमेत अडचणी येत आहेत.

# पालीत पुरामध्ये अडकलेल्यांना मोफत भोजन अन् अल्पोपहार



**पाली : प्रतिनिधी**

पाली येथे अंबा नदीला आलेल्या पुरामुळे शहराला जोडणारे तीनही प्रमुख रस्ते बंद होऊन अनेक प्रवासी, नागरिक, भाविक व वाहनचालक अडकून पडले होते. या सर्वांना श्री बल्लाळेश्वर देवस्थानतर्फे मोफत भोजन, तर नगरपंचायतीतर्फे अल्पोपहार देण्यात आला.

नैसर्गिक संकटामुळे प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या आपत्कालीन परिस्थितीची दखल घेत पालीचे नगराध्यक्ष पराग मेहता यांनी बल्लाळेश्वर देवस्थान अध्यक्ष जितेंद्र गद्रे व देवस्थान प्रशासनाला सहकार्याची विनंती केली. आवाहनाला प्रतिसाद देत देवस्थानच्या अन्नछत्रालयामार्फत अडकून पडलेल्या नागरिकांना दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली. यामुळे प्रवाशांची भुकेची निकड दूर झाली.

### बल्लाळेश्वर देवस्थानसह नगरपंचायतीची बांधिलकी

दुसऱ्या बाजूला अडकलेल्या प्रवाशांना तात्कालिक दिलासा देण्यासाठी नगराध्यक्ष पराग मेहता आणि उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर यांनी स्वतः प्रत्यक्ष जागेवर जात सर्वांना चहा आणि बिस्किटांचे वाटप केले. या उपक्रमास सुधागड तालुका भाजप महिला मोर्चा अध्यक्ष प्रणाली संजोग शेठ यांनीदेखील सहकार्य केले.

या अत्यंत कठीण परिस्थितीत धावून येत मोलाचे सहकार्य करणाऱ्या यंत्रणा, बल्लाळेश्वर देवस्थान आणि संकटसमयी मदतीचा हात पुढे करणाऱ्या सर्व दानशूर व्यक्तींचे व कार्यकर्त्यांचे प्रशासनाच्या वतीने आभार मानण्यात आले आहेत.



**पनवेल :** रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या स्कूल कमिटी सदस्यपदी कविता राजेश खारकर यांची निवड करण्यात आली आहे. याबद्दल 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कविता खारकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राजेश खारकर, सचिन खारकर, रवींद्र खारकर, समीर खारकर, अस्मिता खारकर, ममता खारकर आदी उपस्थित होते.

# रेवदंडा-साळाव पुलावर अवजड वाहतुकीस बंदी

## जिल्हा दंडाधिकारी किशन जावळे यांचे आदेश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा-साळाव पुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुलावरून २० टनांवरील अवजड वाहतुकीस दिवसा व रात्री पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. ही वाहतूक बंदी अधिसूचनेच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत लागू राहणार आहे.

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साळाव पूल अवजड वाहतुकीसाठी धोकादायक स्थितीत असल्याने त्याच्या संरचनात्मक बळकटीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. यापूर्वी पुलावरून १२ टनांवरील अवजड वाहतुकीस बंदी होती. सध्या कंत्राटदारामार्फत दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आहे. पुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने २० टनांवरील जड वाहतूक बंद ठेवणे आवश्यक असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.



कंत्राटदाराने सुचविलेल्या अटींनुसार पुलावर वाहनांची कमाल वेगमर्यादा ताशी ३० किलोमीटर ठेवणे, वाहतूक कोंडी होऊ न देणे आणि दोन वाहनांमध्ये किमान २० मीटरचे अंतर ठेवणे बंधनकारक आहे.पुलावरून होणाऱ्या अति अवजड वाहतुकीमुळे पुलास क्षती पोहोचून संभाव्य दुर्घटना घडू नये, तसेच नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेची सुरक्षितता अबाधित राहावी, या उद्देशाने हे आदेश जारी करण्यात आले आहेत.

जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना बंदी नाही. पुलाची सुरक्षा व संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी वाहनचालक व वाहतूकदारांनी प्रशासनाने निश्चित केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### खानाव पुलावरील भगदाडात पडून शेतकऱ्याचा मृत्यू

**अलिबाग :** अलिबाग-रोहा मार्गावरील वेलवली-खानाव दरम्यानच्या पुलावरील भगदाड अखेर जीवघेणे ठरले. बुधवारी (दि. ८) सकाळी चांगू घरत (रा. वेलवली-खानाव) पायी जाताना पुलावरील मोठ्या भगदाडात पडून वाहून गेले. त्यांचा मृतदेह नंतर पुलालगतच्या शेतात आढळला. या घटनेने परिसरातील वातावरण तणावपूर्ण झाले होते. पुलाला मोठे भगदाड पडून अनेक दिवस झाले होते. इशारा फलक लावले नव्हते, बॅरिकेड्स उभारले नव्हते व धोकादायक भाग बंद करण्यात आला नव्हता, असे स्थानिकांचे म्हणणे आहे. सा. बांधकाम विभाग अभियंता दिनेश पराते यांनी मृतांच्या नातेवाइकांना १५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

# शवविच्छेदन प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा करणार वापर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शवविच्छेदन प्रक्रिया अधिक आधुनिक, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून मुंबईत लवकरच नॉन-इन्वेसिव्ह पोस्टमॉर्टेम (शरीराला चिरफाड न करता शवविच्छेदन) तंत्रज्ञान सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील शवविच्छेदन अहवाल वेळेत उपलब्ध व्हावेत यासाठी शासनाने व्यापक उपाययोजना हाती घेतल्या असून गेल्या दोन ते तीन वर्षांत प्रलंबित अहवालांची संख्या लक्षणीयरीत्या कमी करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला, तर सदस्य सतेज पाटील, अंबादास दानवे, प्रज्ञा सातव, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपप्रश्न उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात सध्या ५३३ शवविच्छेदन केंद्रांमधून कामकाज सुरू असून या वर्षात मे महिन्यापर्यंत १०,९०५ शवविच्छेदन प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या केंद्रांवरील कामाचा



ताण लक्षात घेऊन कर्मचारी, पायाभूत सुविधा आणि इतर कमतरता यांचा आढावा घेऊन त्या समयबद्ध पद्धतीने दूर करण्यात येतील.

अत्याधुनिक नॉन-इन्वेसिव्ह पोस्टमॉर्टेम तंत्रज्ञानामुळे शरीराला चिरफाड न करता तपासणी करता येणार आहे. या तंत्रज्ञानामुळे वेळेची बचत, कमी मनुष्यबळाची गरज, मानवी चुका कमी होणे आणि अत्यंत सूक्ष्म बदलांचे अचूक निदान करणे शक्य होईल. मुंबईतील जे. जे. रुग्णालय व केईएम रुग्णालयात हे तंत्रज्ञान सुरू करण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्रीची खरेदी प्रक्रिया आणि निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पूर्वी शवविच्छेदन अहवाल मिळण्यासाठी सहा महिने ते वर्षभराचा कालावधी लागत असे, मात्र गेल्या दोन ते तीन वर्षांत न्यायवैद्यक प्रयोगशाळांमधील कामकाज गतिमान करून प्रलंबित अहवालांची संख्या सुमारे तीन लाखांवरून ७५ हजारांपर्यंत कमी करण्यात आली आहे.

पुढील तीन ते चार महिन्यांत ही प्रलंबित प्रकरणे नियमित पातळीवर आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. मेडिको-लीगल स्वरूपाच्या प्रकरणांना आणि ज्या प्रकरणांमध्ये व्हिसेरा जतन करण्यात आला आहे, त्यांना प्राधान्य दिले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील काही शवविच्छेदन केंद्रांमध्ये नियमितपणे मृतदेह येत नसले तरी अपघातप्रवण भागांतील केंद्रांवर मोठा ताण असतो. आवश्यक त्या ठिकाणी शीतगृहांची सुविधा उपलब्ध असून सर्व शवविच्छेदन केंद्रांच्या सुविधांचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पोस्टमॉर्टेम प्रक्रियेतील माहिती गोपनीय ठेवणे हे नियमांनुसार बंधनकारक आहे. शवविच्छेदन अहवाल पोलिसांकडे सादर होईपर्यंत कोणतीही माहिती सार्वजनिकपणे देणे चुकीचे आहे. अशा प्रकारचे नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

# खालापुरात झाड कोसळून महिला जखमी ; घर आणि मंदिराचेही नुकसान

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायत हद्दीतील खडक आळीत सोमवारी रात्री महाकाय पिंपळाचा वृक्ष लोकवस्तीत कोसळल्याने एक महिला जखमी झाली. या अपघात घर आणि मंदिराचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच नगरपंचायत प्रशासन आणि पोलीस यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली आणि मदतकार्य सुरू केले.



सोमवारी रात्री साडेनऊच्या सुमारास लक्ष्मीनारायण मंदिराजवळील पुरातन पिंपळाचा वृक्ष कोसळला. वृक्षाच्या महाकाय फांद्या पडवकर यांच्या घरावर आणि लक्ष्मीनारायण मंदिरावर पडल्याने मोठा आवाज झाला. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये एकच गोंधळ उडाला. फांद्या महावितरणाच्या खांब आणि तारांवर पडल्याने विद्युत पुरवठाही खंडित झाला. या दुर्घटनेत एक महिला जखमी झाली. तिला तातडीने खालापूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच खालापूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष किशोर पवार, मुख्याधिकारी कोमल कराळे, कार्यालय अधीक्षक जितेंद्र यादव आणि कोतवाल आरती निधी यांच्यासह खालापूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. स्थानिक तरुणांनी माहिती दिल्यानंतर विजय भोसले यांच्या सहकारी बाबू आखाडे यांनी कुऱ्हाड आणि कटरच्या साह्याने धोकादायक फांद्या काही प्रमाणात बाजूला केल्या. उर्वरित वृक्ष छाटणीचे काम मंगळवारी दिवसभर सुरू होते.

नगरपंचायतीने आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत कामात मदत केली. रात्रीच्या अंधारात धोका टाळून फांद्या हटवल्यानंतर मंगळवारी सकाळी नगरपंचायत कर्मचारी आणि बाबू आखाडे यांच्या मदतीने उर्वरित काम पूर्ण करण्यात आले. तहसीलदार अभय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार सुधाकर राठोड, मंडल अधिकारी संदेश पानसरे, तलाठी कोल्हे आणि कोतवाल आरती निधी यांनी घटनास्थळी पंचनामा केला. लक्ष्मी नारायण मंदिर तसेच पडवकर आणि केतकर यांच्या घराचे झालेले नुकसान भरून देण्यासाठी आवश्यक मदत केली जाईल, असे आश्वासन यावेळी देण्यात आले.

याकामी नगराध्यक्ष रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष किशोर पवार, स्वच्छता निरीक्षक वैभव ओव्हाळ, अभियंता प्रणित भोसले, लेखापाल सिद्धेश देशमुख, कर निरीक्षक अक्षय लोंढे यांच्यासह ग्रामस्थांनी सहकार्य केले.

# पेण नगरीमध्ये काव्यधारा बरसल्या

**पेण : प्रतिनिधी**

धो धो पावसात पेणच्या महात्मा गांधी वाचनालयात मात्र शब्दांचा व कवितांचा सुंदर पाऊस पडला. साहित्याचा शब्दवेल, पनवेल व साहित्यसंपदा, पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित काव्यस्पर्धेत कवींच्या रचनांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. पेणच्या नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांच्या हस्ते काव्यस्पर्धा सोहळ्याचे उद्घाटन झाले. कविता केवळ शब्दांची मांडणी नसून ती मानवी मनाच्या भावविश्वाचे जिवंत प्रतिबिंब आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला ज्येष्ठ साहित्यिक काशिनाथ मढवी, संतोष ठाकूर, विभावरी जोशी, मनोज म्हात्रे, साहित्यिका ज्योत्स्ना राजपूत, सुनीता रामचंद्र, गणेश कोळी आणि स्तंभलेखक-कवी साहित्यसंपदाचे लालसिंग वैराट उपस्थित होते.

काव्य स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राजक्ता सागवेकर, द्वितीय प्रथमेश कासार, तृतीय क्रमांक आर्या जोजे हे कवी विजेते ठरले. उपस्थित सर्व कवींना प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर पालकर यांनी केले.



# बोरघाटात पडलेले झाड हटवताना सामाजिक कार्यकर्त्याचा मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावरील बोरघाटात मुसळधार पावसामुळे रस्त्याच्या मधोमध महाकाय झाड उन्मळून पडल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक सुरळीत करण्याच्या उद्देशाने मदतीला धावलेल्या शिळफाटा येथील सामाजिक कार्यकर्ते अमन मुजावर यांना झाडाच्या फांदीचा फटका बसून त्यांचा मृत्यू झाला.



या दुर्दैवी घटनेने खोपोली आणि परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. बुधवारी दुपारी बोरघाटात झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यावर मोठे झाड कोसळले होते. त्यामुळे दोन्ही बाजूंची वाहतूक ठप्प झाली होती. ही परिस्थिती पाहून अमन मुजावर हे सहकारी नागरिकांसमवेत झाड हटवण्याचे काम करत होते. काम सुरू असतानाच झाडाची एक मोठी फांदी अचानक त्यांच्या अंगावर कोसळली. या अपघात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली.

अमन मुजावर हे समाजाभिमुख, सेवाभावी आणि संकटाच्या काळात मदतीसाठी नेहमीच तत्पर राहणारे युवक म्हणून परिचित होते. इतरांच्या सुरक्षेसाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून मदतकार्य करत असतानाच त्यांच्यावर ही वेळ आली. त्यांच्या जाण्याने शिळफाटा, खोपोली आणि परिसरात शोककळा पसरली आहे. अमन यांना मोठा मित्रपरिवार होता. समाजसेवेच्या कामात अग्रेसर असणाऱ्या या तरुणाच्या अकाली निधनाने सर्वत्र दुःख व्यक्त होत आहे.

# नाणेघोळमधील ६७ नागरिकांचे प्रशासनाकडून केवनाळे सोनारवाडीत सुरक्षित स्थलांतर



**अलिबाग : प्रतिनिधी**

पोलादपूर नाणेघोळ येथे डोंगराला भेगा पडल्याचे निदर्शनास आल्यानंतर संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना केली. नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत येथील एकूण ६७ नागरिकांचे केवनाळे सोनारवाडी येथे सुरक्षित स्थलांतर करण्यात आले आहे.

जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर डोंगराला पडलेल्या भेगांमुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून तातडीने स्थलांतराची कार्यवाही केली. स्थलांतरित करण्यात आलेल्या नागरिकांमध्ये ३० महिला, ३२ पुरुष आणि ५ मुलांचा समावेश आहे. प्रशासनाच्या सतर्कतेमुळे आणि वेळीच करण्यात आलेल्या कार्यवाहीमुळे सर्व नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात यश आले.

संभाव्य धोक्याची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून समन्वयाने कार्य केले. विशेषतः महिला, लहान मुले आणि वृद्धांच्या सुरक्षिततेची काळजी घेत स्थलांतराची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. केवनाळे सोनारवाडी येथे स्थलांतरित नागरिकांसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. प्रशासनाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. पावसाची स्थिती आणि डोंगर परिसरातील संभाव्य धोका लक्षात घेऊन संबंधित यंत्रणा सतर्क ठेवण्यात आल्या आहेत.

आपत्तीच्या काळात नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे. तसेच डोंगराला भेगा पडणे, दरड कोसळण्याची शक्यता किंवा अन्य कोणतीही धोकादायक बाब निदर्शनास आल्यास त्याची माहिती तातडीने स्थानिक प्रशासनाला द्यावी, असे आवाहन करण्यात आले. नागरिकांची सुरक्षितता प्रथम भूमिकेतून प्रशासनाने केलेल्या या तत्पर आणि प्रतिबंधात्मक कार्यवाहीमुळे संभाव्य धोका टळला असून सर्व ६७ नागरिक सुरक्षित आहेत.

पान १ वरुन

## महाराष्ट्राला बदनाम करू नका!

कोकण रेल्वे उभारतानाही अनेकांनी दरड कोसळण्याच्या भीतीने हा प्रकल्प चालू शकणार नाही, असे म्हटले होते, मात्र तत्कालीन रेल्वेमंत्री मधू दंडवते यांनी हिंमत दाखवून धाडसी निर्णय घेतला. रेल्वे सुरू झाल्यावर सुरुवातीची १५ वर्षे तिथे सातत्याने दरडी कोसळल्या, पण त्यातून धडे घेऊन तांत्रिक उपाययोजना केल्या गेल्या. जर केवळ त्या भीतीपोटी कोकण रेल्वेच उभारली नसती, तर आज कोकणची काय अवस्था झाली असती?" असा सवाल मुख्यमंत्र्यांनी उपस्थित केला.

मिसिंग लिंकवर घडलेल्या घटनेबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, वरून दरड पाण्याच्या कमानीवर कोसळल्यामुळे ती तुटली आणि ढिगारा खाली आला, मात्र बोगद्यात इमर्जन्सी बटन दाबताच अवघ्या तीन मिनिटांत क्रेन आली आणि प्रवाशांनी स्वतः सांगितले की बोगदा होता म्हणूनच आम्ही वाचलो. तरीही काहींनी लगेच 'सात हजार कोटी पाण्यात गेले' असे खोटे व्हिडीओ फिरवण्यास सुरुवात केली, मात्र या टीकाकारांच्या थोबाडावर टिच्चून प्रशासनाने अवघ्या १८ तासांत तिथली वाहतूक पूर्ववत सुरू करून दाखवली.

सोशल मीडियावरून पैशांच्या जोरावर सुरू असलेल्या बदनामीच्या मोहिमेवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, "ज्यांना गल्लीत कुत्रा विचारत नाही, ते आज सोशल मीडियावर येऊन सगळ्यांना शिव्या देत आहेत. काही भाड्याचे टट्टू पैसे घेऊन सोशल मीडियावर लिहीत आहेत. मी त्यांना स्पष्ट सांगतो, महाराष्ट्राचा अपमान कराल तर मी सोडणार नाही. या घटनेतून आपण शिकलो आहोत, पाण्याचा प्रवाह कसा बदलू शकतो हे लक्षात आले आहे. आता आपण आयआयटीमधील तज्ज्ञांचा सल्ला घेऊन नव्या उपाययोजना करणार आहोत, जेणेकरून भविष्यात अशी घटना घडणार नाही. आजपासून १० वर्षांनी या प्रकल्पावरून आमच्यावर चिखलफेक करणारे कुठेच दिसणार नाहीत, पण हा प्रकल्प तिथेच असेल, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी विरोधकांचे आरोप खोडून काढले.

## हिट अँड रन प्रकरणातील चालकाला अटक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिट अँड रन प्रकरणातील कारचालक अरफात साबीर पटेल (२२, राहणार तळोजा, पाचनंद) याला तळोजा पोलिसांनी बुधवारी (दि. ८) अटक केली. अरफात पटेल याने इलेक्ट्रिक गाडी क्रमांक एमएच ४६ डीए ४८ १४ भरधाव वेगाने चालवून ७ जुलै रोजी स्कुटी, टेम्पो आणि मोटरसायकलला धडक दिली होती. या धडकेत नदीम खानचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले होते. त्यानंतर घटनास्थळावरून आरोपी पळून गेला होता. तळोजा पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.



# अशोक लोखंडे विद्यालयात गणवेश कापडाचे मोफत वाटप



**मुरुड : प्रतिनिधी**

पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीच्या सुमारे ३० शालेय विद्यार्थ्यांना मुंबई हायकोर्टाचे वकील तेजेश दिगंबरराव दंडे यांच्या आर्थिक मदतीतून मोफत गणवेश कापडाचे वाटप करण्यात आले. बुधवारी (दि. ८) झालेल्या या कार्यक्रमाला दंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. समाजसेवक संदीप मोडक यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील या शाळेची निवड करण्यात आली.

ग्रामीण भागातील गोर-गरीब विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती त्यांनी दंडे यांच्यासमोर मांडून शाळेसाठी मदत मिळवून दिली. त्यांच्या या भूमिकेबद्दल मुख्याध्यापक अकील मुलाणी यांनी त्यांचे विशेष आभार मानले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वकील तेजेश दंडे म्हणाले, "प्रत्येक विद्यार्थ्याने वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. 'असे का घडते' या प्रश्नाची उत्सुकता आणि उत्तर शोधण्याची जिज्ञासा असली पाहिजे. शालेय अभ्यासाबरोबरच अवांतर वाचनाची आवड जोपासणे आवश्यक आहे. आजचे जग स्पर्धात्मक आहे. प्रत्येक आव्हानाला तोंड देण्यासाठी विद्यार्थी सक्षम आणि कणखर असणे गरजेचे आहे. वेळेवर अभ्यास केल्यास चांगले गुण मिळवणे सोपे जाते."

कार्यक्रमासाठी विश्वस्त महादेव गोळे, अध्यक्ष गणपत जगताप, उपाध्यक्ष मनोहर गायकवाड, सेक्रेटरी गोविंद ठाकर गुरुजी, ज्येष्ठ संचालक कृष्णा पंदेरे गुरुजी, सदस्य खेळु वाजे, विठोबा धुमाळ, कृष्णकांत पवार, राजू थिटेकर, पन्हेळी गावचे अध्यक्ष पाखड साहेब, मुख्याध्यापक अकील मुलाणी, सुखदेव सवईसर्जे, संजय ठमके, संदीप इंगावले, एकनाथ कोळी, सुप्रिया रेडीज, रेखा रेडीज, नीलम गोळे, वरिष्ठ लिपिक दीपक भोसले यांच्यासह अनेक मान्यवर, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेची सज्जता!

## मान्सूनकाळात १७ निवारा केंद्र, १४ अग्निशमन वाहने तैनात

**पनवेल : वार्ताहर**

यंदाच्या मान्सूनमध्ये संभाव्य पूरस्थिती आणि नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'मान्सूनपूर्व तयारी २०२६' अंतर्गत व्यापक नियोजन केले आहे. घनकचरा, अग्निशमन, आरोग्य आणि निवारा केंद्रे अशा चारही आघाड्यांवर पालिकेची यंत्रणा सज्ज झाली असून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

पालिकेने २३ मार्चपासून नालेसफाई मोहिमेला सुरुवात केली. दररोज ३१५ कामगारांच्या माध्यमातून ही मोहीम राबवण्यात आली. पालिका हद्दीतील १०२ मोठे आणि १९२३ छोटे असे एकूण २९४.०६ किलोमीटर लांबीच्या नाल्यांची सफाई पूर्ण करण्यात आली आहे. खारघर, कळंबोली, कामोठे आणि पनवेल या चारही प्रभाग समित्यांमध्ये युद्धपातळीवर काम करून नालेसफाई करण्यात आली. यंदा पावसाला उशिराने सुरुवात झाली. जूनअखेर पावसाने पनवेलमध्ये हजेरी लावल्याने पालिका अ‍ॅक्शन मोडवर आली आहे. पालिका महापौर नितीन पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त कैलास गावडे यांनी आपत्कालीन यंत्रणेचे नियोजन केले आहे.




### बचाव यंत्रणा सज्ज

बचावकार्यासाठी अग्निशमन विभाग पूर्णपणे सज्ज आहे. ४० प्रशिक्षित कर्मचारी २४ तास तैनात आहेत. त्यांच्याकडे १४ अग्निशमन वाहने, दोन इंजिन बोटी, दोन साध्या बोटी आणि १६ सॉ-कटर उपलब्ध आहेत. यामध्ये तीन फायर इंजिन, दोन वॉटर टँकर, रेस्क्यू व्हॅन आणि १६ हजार लिटर क्षमतेचे दोन फायर वॉटर बाऊझर यांचा समावेश आहे. जलद संपर्कासाठी १५ वॉकीटॉकी हँडसेट आणि एक बेस स्टेशन कार्यरत आहेत. याशिवाय ३० सर्चलाईट, ६० लाईफ जॅकेट, ३० लाईफ रिंग, १२ वुडकटर मशिन, सहा फ्लोटिंग पंप तसेच दोर, घन, फावडे, टॉर्च यांसारखे बचाव साहित्य पुरेशा प्रमाणात साठवण्यात आले आहे.

### निवारा केंद्रांची व्यवस्था

अतिवृष्टीमुळे सखल भागात पाणी शिरल्यास नागरिकांच्या तात्पुरत्या निवाऱ्यासाठी पालिकेने प्रभाग 'अ'मध्ये आठ, 'ब'मध्ये दोन, 'क'मध्ये तीन आणि 'ड'मध्ये चार अशी एकूण १७ निवारा केंद्रे निश्चित केली आहेत. यामध्ये शाळा, समाजमंदिरे व महापालिकेच्या इमारतींचा समावेश आहे. केंद्रासाठी स्वतंत्र संपर्कप्रमुख व मोबाइल क्रमांक नेमण्यात आले. नागरिकांनी ०२२-२७४६१५०० हेल्पलाइनवर संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

### आरोग्य यंत्रणा अलर्टवर

मान्सूनकाळात उद्‌भवणाऱ्या लेप्टोस्पायरोसिस, डेंग्यूसारख्या साथरोगांवर नियंत्रणासाठी २६ आरोग्य केंद्रे आणि सहा सुसज्ज अ‍ॅम्ब्युलन्स तैनात केल्या आहेत. रॅपिड रिस्पॉन्स टीममध्ये डॉक्टर, स्टाफ नर्स, फार्मासिस्ट, दोन अटेंडंट असतील. ६५० प्रकारच्या आवश्यक औषधांचा साठा करण्यात आला असून एमजीएम व सरकारी रुग्णालयात राखीव बेड्सची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

# प्रेमसंबंधातून अल्पवयीन मुलगी बनली आई; तरुण गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे परिसरात राहणाऱ्या २० वर्षीय तरुणाने अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या अत्याचारामुळे पीडित मुलगी गरोदर राहून तिने मुलीला जन्म दिला आहे.

मो. तैस (२०) असे आरोपीचे नाव असून कामोठे पोलिसांनी त्याच्यावर बलात्कार आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्याला तत्काळ अटक केली आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी मो. तैस आणि पीडित अल्पवयीन मुलगी दोघेही कामोठे गावात राहतात. आरोपीने नोव्हेंबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीत पीडित मुलीसोबत प्रेमसंबंध प्रस्थापित करून तिच्या राहत्या घरी जबरदस्तीने वारंवार शारीरिक संबंध ठेवले. त्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहिली.

पीडितेने हा प्रकार घरी सांगितला नव्हता. काही दिवसांपूर्वी तिच्या पोटात दुखू लागल्याने कुटुंबीयांना ती गरोदर असल्याचे समजले. त्यानंतर तिला एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे तिने मुलीला जन्म दिला. प्रसूतीदरम्यान पीडिता अल्पवयीन असल्याचे समजताच रुग्णालय प्रशासनाने कायद्यानुसार तातडीने माहिती कामोठे पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी पीडितेचा जबाब नोंदवून आरोपी मो. तैसविरुद्ध गुन्हा दाखल केला आणि त्याला अटक केली. पुढील तपास कामोठे पोलीस करीत आहेत.

# स्कुटीचालकाचा अपघातात मृत्यू; वाहनचालक पसार

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथून स्कुटीवरुन मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या व्यक्तीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. ही घटना मुंबई-पुणे महामार्गावरील खारघर येथील हिरानंदानी उड्डाणपुलावर घडली.

मृताचे नाव निनाद सुधीर सावंत (४०) असे आहे. ते कामोठे येथे राहत होते. सावंत हे त्यांच्या टीव्हीएस जुपिटर स्कुटी क्रमांक MH-४६-DH-६१४३ वरून मुंबई-पुणे महामार्गावरून मुंबईच्या दिशेने जात होते. हिरानंदानी उड्डाणपुलावरून जात असताना पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहन चालकाने भरधाव वेगात, निष्काळजीपणे आणि हलगर्जीपणाने त्यांच्या स्कुटीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात निनाद सावंत गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित अज्ञात वाहन चालकाने जखमींना कोणतीही वैद्यकीय मदत न करता आणि पोलिसांना माहिती न देता घटनास्थळावरून पलायन केले. याप्रकरणी खारघर पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी घटनास्थळावरील आणि महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आणीबाणीच्या ५१ वर्षांवर परिसंवाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण समिती आणि विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जून रोजी सकाळी ११.३० वाजता "आणीबाणी : इतिहासातील ५१ वर्षे" या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. लोकशाहीच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या आणीबाणीच्या ५१ वर्षांनिमित्त विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. ऐतिहासिक, सामाजिक आणि लोकशाही मूल्यांवरील परिणाम यावर या परिसंवादात सखोल चर्चा झाली.

या परिसंवादासाठी प्रभाकर तिजारे, मधू पाटील आणि दीपक शिंदे (सीडीसी सदस्य) हे मान्यवर वक्ते उपस्थित होते. त्यांनी आणीबाणीच्या काळातील घटना, लोकशाहीवरील परिणाम आणि त्यातून मिळणारे धडे याविषयी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यांनी विविध प्रश्न विचारून परिसंवाद अधिक समृद्ध केला.

कार्यक्रमाचे आयोजन डॉ. प्रवर शर्मा, प्रमुख-विद्यार्थी कल्याण समिती आणि विशाल देशमुख, प्रमुख-विद्यार्थी परिषद यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.



# पनवेलमध्ये सहा दिवसांत रेकॉर्डब्रेक पाऊस

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू झालेल्या पावसाने जुलै महिन्यात रौद्ररूप धारण केले. पनवेलमध्ये गेल्या सहा दिवसांत १००० मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले होते.

जून महिना संपत आला तरी पनवेल तालुक्यात पावसाचा पत्ता नव्हता. साधारणतः ७ जून रोजी पावसाला सुरुवात होते, मात्र यंदा २३ जून रोजी पावसाला सुरुवात झाली. त्यानंतर तीन ते चार दिवस पाऊस नव्हता. २८ जूनपासून पावसाने नियमित हजेरी लावली आणि जुलै महिन्यात पावसाने हाहाकार माजवला. गेल्या सहा दिवसांत पनवेल तालुक्यात मुसळधार पाऊस बरसला. नद्यानाले ओसंडून वाहू लागले. मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने अनेकांनी कामावर दांडी मारली. नद्यांना पूर आल्याने वाहतुकीवरही परिणाम झाला.




### सहा दिवसांची पावसाची आकडेवारी

१ जुलै - १९१ मिलिमीटर
२ जुलै - ११६ मिलिमीटर
३ जुलै - ७८ मिलिमीटर
४ जुलै - २८२ मिलिमीटर
५ जुलै - २२५ मिलिमीटर
६ जुलै - ७४ मिलिमीटर

### वाहतुकीवर परिणाम, वाहनचालकांची कसरत

बुधवारी धो धो पाऊस बरसल्याने अनेक ठिकाणी पाणी साचले होते. यावेळी रस्त्यावरून वाहने बाहेर काढताना नागरिकांची त्रेधातिरपीट उडाली. बुधवारी पहाटेपासूनच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. यामुळे सखल ठिकाणच्या रस्त्यांवर पाणी साचले, तर शेतांमध्येदेखील पाणी साचले. त्यामुळे त्या ठिकाणाहून चालताना आणि वाहन बाहेर काढताना नागरिकांची तारांबळ उडाली. मुसळधार पाऊस बरसत असल्याने गाढी नदीला महापूर आला होता. या पावसाचा फटका अनेकांना बसला. अनेकांची दुचाकी वाहने रस्त्यातच बंद पडली.

# पटसंख्येअभावी जिल्हा परिषद शाळा ओस!

## मराठी शाळांमधून अमराठी विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठी वाढ



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेच्या एकूण ५६ प्राथमिक शाळा आहेत. या शाळांमध्ये दरवर्षी पटसंख्येत लक्षणीय घट होत आहे. पटसंख्येअभावी शाळा ओस पडू लागल्याने जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. सध्या पालकांकडून इंग्रजी माध्यमाला प्राधान्य दिले जात असल्यामुळे या शाळांमधून स्थानिक विद्यार्थी संख्या रोडावत आहे.

तालुक्यातील ५६ शाळांना काही प्रमाणात भेडसावणाऱ्या सोयीसुविधांबरोबरच दिवसेंदिवस शिक्षकांना विद्यार्थ्यांची होणाऱ्या गळतीचीच अधिक चिंता सतावत आहे. पाल्यांच्या भवितव्यासाठी इंग्रजी माध्यमातील खासगी शाळांच्या आकर्षणामुळे पटसंख्या झपाट्याने कमी होऊ लागली आहे. उरणमधील जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांमध्ये शिक्षक आहेत, तर पटसंख्या कमी आहे.

**ग्रामीण भागातील शाळांच्या पाहणीत मोठी जुई, आवरे, मुळेखंड, चाणजे, कोंढरीपाडा येथील शाळा नादुरुस्त असल्याचे आढळून आले आहे. ग्रामस्थांच्या तक्रारींनंतर त्यांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहेत.**
**-सागर पवार,** गट शिक्षणाधिकारी, उरण पंचायत समिती

नोकरी-व्यवसाय आणि मोलमजुरी करण्यासाठी आलेल्या परराज्यातील अमराठी पाल्यांची मुले-मुली याच शाळांत शिक्षण घेत आहेत. मराठी शाळांतून अमराठी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अनेक गावांत आपल्या मुलांना गावातच प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी नागरिकांनी जागा जमिनी मोफत दिल्या आहेत, तर या शाळांच्या इमारती अंगमेहनतीने व लोकवर्गणीतून उभ्या केल्या. या शाळा सध्या ओस पडू लागल्या आहेत.

# अमली पदार्थ विक्रीप्रकरणी एकाला अटक

**एक लाख २५ हजारांचा एमडी जप्त**

**पनवेल : वार्ताहर**

पोलिसांनी ड्रग्जविक्रीविरोधात मोठी कारवाई करत एका संशयिताला अटक केली आहे. त्याच्याकडून एक लाख २५ हजार रुपये किमतीचे पाच ग्रॅम मेफेड्रॉन अर्थात एमडी जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी अवेज समीर पठाण (३६, रा. उलवे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. उलवे परिसरात ड्रग्जविक्रीच्या घटना सातत्याने उघडकीस येत आहेत. यापूर्वीही पोलिसांनी येथे अनेक कारवाया केल्या आहेत, मात्र तरीही अमली पदार्थांची विक्री आणि सेवन सुरूच असल्याचे समोर येत आहे. उलवे परिसरात एक व्यक्ती मेफेड्रॉन विक्रीसाठी येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडे पाच ग्रॅम मेफेड्रॉन आढळून आले.

# शाखा अभियंता विनायक ताठरे सेवानिवृत्त

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समिती येथील शाखा अभियंता विनायक परशुराम ताठरे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांना गटविकास अधिकारी समीर वाठारकर, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता विनोद माहोरे, उपअभियंता (बांधकाम) राखाडे यांच्यासह अनेकांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विनायक ताठरे यांचे मूळ गाव वांद्री (ता. संगमेश्वर) असून त्यांनी शिक्षण-शासकीय तंत्रनिकेतन रत्नागिरी येथून सिव्हिल इंजिनिअरिंगमधील पदविका घेतली. १७ डिसेंबर १९९३ रोजी पंचायत समिती पोलादपूर येथे कनिष्ठ आरेखक पदावर रुजू झाले. १८ वर्षे सहा महिने पोलादपूर येथे सेवा केली. त्यानंतर ४ जुलै २०१२ पासून पनवेल पंचायत समिती येथे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर हजर झाले. २० सप्टेंबर २०१६ रोजी कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नतीने पंचायत समिती पेण येथे बदली झाली. सहा वर्षे सहा महिने पेण येथे कामकाज केल्यावर एप्रिल २०२२ मध्ये शाखा अभियंता म्हणून पंचायत समिती पनवेल येथे बदली झाली. विनायक ताठरे ३० जून २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.




# उलवेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये विद्यार्थी परिषद निवडणूक उत्साहात




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव रुजवण्यासाठी सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे येथे विद्यार्थी परिषद सदस्य निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. शाळेतील विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रियेचे महत्त्व समजावे आणि नेतृत्वगुणांचा विकास व्हावा या उद्देशाने ही निवडणूक आयोजित करण्यात आली होती.

इयत्ता ५वी ते ९वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवत आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदान प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. मतदानासाठी आवश्यक सर्व व्यवस्था शाळेमार्फत करण्यात आली होती. मुख्याध्यापिका मुक्ता भानुदास खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा शिक्षक संग्राम फोफेरकर, वृषाली लोखंडे आणि उपशिक्षक हर्षल फडके यांनी विद्यार्थी परिषद सदस्य निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया यशस्वीरीत्या राबवली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला तसेच जबाबदार नागरिकत्वाची जाणीव अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.




## संपादकीय

# सज्जता आवश्यक

हवामानातील बदलांमुळे कमी कालावधीत प्रचंड प्रमाणात अतिवृष्टी होण्याच्या घटना वाढत आहेत. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, पुणे, सातारा, कोकण आणि घाटमाथ्यावरील भागांमध्ये याचा परिणाम नुकताच स्पष्टपणे दिसून आला. अतिवृष्टी ही आता अपवादात्मक घटना राहिलेली नाही असे गेल्या काही वर्षांतील अनुभवांतून स्पष्ट दिसते. त्यामुळेच अशा परिस्थितीत तातडीच्या मदतकार्याबरोबर दीर्घकालीन तयारीचे महत्त्वही अधोरेखित होते आहे.

**गेले चार दिवस राज्यातील काही भागांमध्ये अतिवृष्टीमुळे पूरसदृश स्थिती ओढवली तर दरडी कोसळण्याच्या घटनांनीही आव्हान उभे केले. आता बहुतांश ठिकाणी परिस्थिती नियंत्रणात आली असली तरी येत्या काळात पुन्हा अशी परिस्थिती ओढवू शकते हे ध्यानात घेऊन त्यादृष्टीने सज्जता ठेवणे आवश्यक झाले आहे. अतिवृष्टीचा मोठा फटका बसलेल्या भागांपैकी वसई–विरारमध्ये पावसाचा मारा कमी झाला असला तरी पुरानंतरची परिस्थिती अजुनही आव्हानात्मक आहे. वीजपुरवठा, पिण्याचे पाणी, दळणवळण आणि सखल भागांत साचलेले पाणी या समस्या तेथे अजुनही पूर्णपणे दूर झालेल्या नाहीत. एकंदरच राज्यातील चित्र पाहता अतिवृष्टीच्या परिस्थितीत तातडीच्या मदतकार्याबरोबरच दीर्घकालीन तयारीचे महत्त्व अधोरेखित होते आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यांची अचूकता वाढली असली तरी स्थानिक पातळीवरील यंत्रणांनी त्या माहितीचा अधिक प्रभावी वापर करण्याची गरज दिसते आहे. राज्य सरकारने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तसेच जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय वाढवण्याचे प्रयत्न केले आहेत. काही ठिकाणी संभाव्य धोकादायक भागांमधून नागरिकांचे स्थलांतरही करण्यात आले तर रस्ते व रेल्वे वाहतूक सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर काम करण्यात आले. मात्र बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर केवळ प्रतिसादात्मक उपाय पुरेसे ठरणार नाहीत असे दिसते. इथून पुढे भविष्यातील पर्जन्यमानाचा विचार करून पायाभूत सुविधांची रचना करावी लागेल. शहरांतील जलनिस्सारण व्यवस्था अधिक सक्षम करणे, नाल्यांचे नियमित गाळमुक्तीकरण आणि अनियंत्रित बांधकामांवर नियंत्रण ही काळाची गरज आहे. डोंगराळ भागांमध्ये भूगर्भीय सर्वेक्षणाच्या आधारे दरडप्रवण क्षेत्रांविषयी नागरिकांना आधीच सावध करणे आवश्यक आहे. राज्य सरकारने अलीकडील काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर भर दिला आहे. अत्याधुनिक यंत्रणेच्या वापरातून नागरिकांपर्यंत वेळेत सूचना पोहोचल्यास जीवितहानी आणखी कमी करता येऊ शकते. या सज्जतेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती आणि नागरिकांचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. आपत्ती व्यवस्थापन ही केवळ सरकारी यंत्रणेची जबाबदारी नसून सामूहिक उत्तरदायित्व आहे. कारण हवामान बदल ही भविष्यातील बाब नसून ते वर्तमानातील वास्तव आहे हे सध्या दिसणाऱ्या परिस्थितीतून पुरते स्पष्ट होते आहे. त्यामुळे विकास, पर्यावरण संवर्धन आणि आपत्ती व्यवस्थापन यांचा समतोल साधणारे धोरण आवश्यक आहे. राज्य सरकारने गेल्या काही वर्षांत आपत्ती व्यवस्थापनाची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढवण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत. वाढत्या अतिवृष्टीच्या पॅटर्नला लक्षात घेऊन यापुढे आपत्कालीन परिस्थिती ओढवण्याआधीच त्यासाठीचे नियोजन करावे लागणार आहे. वसई–विरारमध्ये ओढवलेली गंभीर परिस्थिती पाहता नागरिकांनीही अतिवृष्टीच्या दृष्टीने सज्जता ठेवणे आवश्यक झाले आहे. आपत्कालीन संपर्कासाठी मोबाइल चार्जिंग, पिण्याच्या पाण्याचा व अन्नधान्याचा पुरेसा साठा, वीज खंडित झाल्यास त्यादृष्टीने पूर्वतयारी तसेच अत्यावश्यक औषधांचा साठा ठेवणे आदी खबरदारी सर्व भागांतील नागरिकांनी पावसाळ्यात बाळगणे अत्यावश्यक आहे. नदीकाठची गावे, घाटरस्ते आणि दरडप्रवण भागांत विशेष खबरदारी घेणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे.**

# एसआयआर : मतदानाचा अधिकार होणार अधिक भक्कम




मतदानाचा दिवस उजाडतो. उत्साहाने एक नागरिक मतदान केंद्रावर पोहोचतो. रांगेत उभा राहतो. त्याची वेळ येते. मात्र मतदार यादी तपासल्यानंतर त्याला सांगितले जाते आपले नाव यादीत नाही. काही क्षणांसाठी तो स्तब्ध होतो. मतदानाचा अधिकार असतानाही तो त्या दिवशी तो वापरू शकत नाही. त्या क्षणी त्याला जाणवते की लोकशाहीतील सर्वात मोठा अधिकार केवळ मतदानाच्या दिवशी मिळत नाही; तो त्याही आधी मतदार यादीत आपल्या नावाच्या अचूक नोंदीपासून सुरू होतो.

ही जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी, यासाठी भारत निवडणूक आयोगा मार्फत वेळोवेळी यादी अद्यावत करण्यात येते. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर). ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय उपक्रम नाही; ती प्रत्येक पात्र नागरिकाच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न आहे.

### मतदार यादी म्हणजे लोकशाहीचा पाया

घराचा मजबूत पाया दिसत नाही, पण संपूर्ण घर त्यावर उभे असते. मतदार यादीचेही तसेच आहे. मतदान केंद्रावरील मतपेटी, निवडणुकीची प्रक्रिया किंवा निकाल यापूर्वी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची असतेमतदार यादीची अचूकता.

मतदार यादी ही केवळ नावांची यादी नसते. ती देशातील प्रत्येक पात्र नागरिकाच्या समान अधिकाराची अधिकृत नोंद असते. या यादीत नाव अचूक असणे म्हणजे मतदानाचा अधिकार सुरक्षित असणे. नाव, पत्ता किंवा इतर माहिती योग्य असल्यामुळे भविष्यातील मतदानाच्या दिवशी कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे मतदार यादीतील प्रत्येक नोंद ही लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ करणारी ठरते.

### एसआयआर का आवश्यक आहे?

दरवर्षी नियमित पुनरीक्षणाची प्रक्रिया होत असते. त्यामध्ये नवीन मतदारांची नोंद, माहितीतील बदल किंवा दुरुस्ती केली जाते. मात्र काही वेळा अधिक व्यापक आणि सखोल पडताळणीची आवश्यकता निर्माण होते. अशा वेळी एसआयआर राबविण्यात येते.

या विशेष पुनरीक्षणाचा उद्देश प्रत्येक पात्र मतदाराची नोंद शक्य तितकी अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह ठेवणे हा असतो. कालांतराने स्थलांतर, पत्त्यातील बदल, नव्याने पात्र झालेले मतदार किंवा इतर कारणांमुळे माहितीमध्ये बदल होऊ शकतात. एसआयआर या सर्व बाबींकडे अधिक बारकाईने पाहते. त्यामुळे मतदार यादी अधिक सक्षम, पारदर्शक आणि वास्तवाशी सुसंगत बनते.

ही प्रक्रिया भविष्यातील निवडणुकांमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग अधिक सहज आणि निर्विघ्न व्हावा, यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

### घरभेट देणारा अधिकारी विश्वास जपणारा दुवा

या प्रक्रियेदरम्यान बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) किंवा निवडणूक कर्मचारी नागरिकांच्या भेटी घेतात. अनेकदा ही भेट केवळ कागदपत्रांची पडताळणी वाटू शकते. पण प्रत्यक्षात ती त्यापेक्षा कितीतरी मोठी असते.

घराच्या दाराशी आलेला बीएलओ हा केवळ माहिती नोंदवणारा अधिकारी नसतो; तो प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहावा, यासाठी काम करणारा महत्त्वाचा दुवा असतो. त्याच्या नोंदींमुळे मतदार यादी अधिक अचूक बनते आणि भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक तयारी पूर्ण होते.

ही प्रक्रिया नागरिक आणि निवडणूक व्यवस्थापन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करते. कारण लोकशाही मजबूत होण्यासाठी प्रशासन आणि नागरिक यांचा परस्पर संवाद तितकाच आवश्यक असतो.

### ही प्रक्रिया प्रशासनासाठी नव्हे; प्रत्येक मतदारासाठी

लोकशाहीमध्ये प्रत्येक मत समान मूल्य घेऊन येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आवाज त्यातून व्यक्त होतो. त्यामुळे मतदार यादीतील स्वतःची माहिती अचूक राहणे म्हणजे आपल्या त्या आवाजाची खात्री करून घेणे होय.

एसआयआर ही कोणत्याही एका विभागासाठी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी राबवली जाणारी प्रक्रिया नाही. तिचा सर्वाधिक लाभ नागरिकालाच मिळतो. कारण योग्य आणि अद्ययावत मतदार यादी म्हणजे भविष्यात मतदानाच्या दिवशी आत्मविश्वासाने मतदान करता येण्याची खात्री.

या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे केवळ एक औपचारिकता पूर्ण करणे नव्हे; तर स्वतःच्या घटनात्मक अधिकाराचे जतन करण्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे होय. लोकशाहीतील आपली उपस्थिती नोंदविण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे.

### उद्याच्या मतदानाचा विश्वास आजच्या सहभागातून

लोकशाही ही केवळ निवडणुकीच्या दिवशी जिवंत होत नाही. ती प्रत्येक वेळी बळकट होते, जेव्हा प्रत्येक पात्र नागरिकाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया मनापासून पूर्ण केली जाते.

एसआयआर ही अशीच एक विश्वास निर्माण करणारी प्रक्रिया आहे. आज काही मिनिटे देऊन केलेली माहितीची पडताळणी उद्या मतदानाच्या दिवशी निश्चिंतपणे मतदान करण्याचा आत्मविश्वास देते. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ नोंदी अद्ययावत करण्यापुरती मर्यादित राहत नाही; ती नागरिक आणि लोकशाही यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा पूल बनते.

प्रत्येक मत महत्त्वाचे असते, कारण त्यामागे एका नागरिकाची ओळख, त्याचा अधिकार आणि देशाच्या लोकशाहीवरील विश्वास दडलेला असतो. म्हणूनच एसआयआर ही "कोणासाठी तरी" नसून आपल्या प्रत्येकासाठी आहे. या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे आपल्या मतदानाच्या अधिकाराला अधिक सुरक्षित, सक्षम आणि भविष्यासाठी निश्चित करण्याचा सकारात्मक निर्णय. आणि म्हणूनच, ही प्रक्रिया माझ्यासाठी आहे आणि त्यात सहभागी होणे हे माझ्या लोकशाही प्रवासाचे स्वाभाविक पाऊल आहे.

महाराष्ट्रात भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत एसआयआर अंतर्गत घरभेटींद्वारे गणना प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या काळात बूथ लेव्हल अधिकारी प्रत्येक घराला भेट देऊन गणना फॉर्म उपलब्ध करून देतात, आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी करतात आणि मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करण्यासाठी माहिती संकलित करतात. त्यानंतर प्राप्त माहितीची छाननी, दावे व हरकतींची प्रक्रिया पूर्ण करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अचूक, सुरक्षित आणि निर्विघ्न राहावा हा आहे.

**–सचिन अडसूळ,**
**जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर**

## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईलवरून फसवणूक करण्याचे वाढते प्रकार

मोबाईल फोनवर अनोळखी नंबरवरून कॉल आल्यास तो उचलण्याआधी अनेकजण दोनदा विचार करतात किंवा थेट कॉल दुर्लक्षित करतात. वाढत्या स्पॅम कॉल्स,



ऑनलाइन फसवणूक आणि बनावट फोन कॉल्समुळे नागरिकांचा अनोळखी नंबरांवरील विश्वास कमी होत चालला आहे. याचा परिणाम आता केवळ वैयक्तिक संवादावरच नाही, तर व्यावसायिक कॉल्सवरही होत असल्याचे समोर आले आहे.

ट्रूकॉलरने टाटा टेली बिझनेस सर्व्हिसेस (TTBS) आणि संशोधन संस्था Kantar यांच्या सहकार्याने हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालानुसार, भारतातील सुमारे ७९ टक्के लोक अनोळखी नंबरवरून येणारे बिझनेस कॉल्स उचलणे टाळतात. यामागील प्रमुख कारण म्हणजे वाढते स्पॅम कॉल्स आणि फसवणुकीचे प्रकार. या प्रकारांमुळे ग्राहकांचा विश्वास कमी होत असून अनेकजण कोणत्याही अनोळखी नंबरवरून आलेला कॉल उचलण्यास तयार नसतात.

डिजिटल युगात ई–मेल, एसएमएस आणि चॅटिंगच्या सुविधा मोठ्या प्रमाणावर वापरल्या जात असल्या तरी ग्राहकांची पसंती अजूनही व्हॉइस कॉल्सलाच असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सर्वेक्षणानुसार, ७६ टक्के ग्राहक ई–मेल, एसएमएस किंवा चॅटपेक्षा व्हॉइस कॉलला अधिक प्राधान्य देतात. यावरून ग्राहकांना थेट संवाद अधिक प्रभावी वाटत असल्याचे स्पष्ट होते.

हा अहवाल तयार करण्यासाठी देशातील १७ शहरांमधील ५००हून अधिक B२B कंपन्या आणि १,००० ग्राहकांवर सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणात असे आढळून आले की, ग्राहक अशाच कॉल्सना महत्त्व देतात ज्यामध्ये कॉल करणाऱ्याची स्पष्ट ओळख दिलेली असते, कॉलचा उद्देश महत्त्वाचा आणि संबंधित असतो आणि कॉल विश्वसनीय वाटतो. याउलट, अनोळखी नंबर पाहून अनेकजण कॉल स्वीकारण्याचे टाळतात.

वाढत्या स्पॅम आणि फसव्या कॉल्सचा परिणाम केवळ ग्राहकांवरच होत नाही, तर वैध व्यवसायांनाही त्याचा फटका बसत आहे. अनेक वेळा महत्त्वाचे बँकिंग, विमा, सेवा किंवा ग्राहक सहाय्याशी संबंधित कॉल्सही ग्राहक उचलत नाहीत, कारण त्यांना कॉल करणाऱ्या व्यक्तीची ओळख स्पष्ट नसते. यामुळे कंपन्यांच्या ग्राहकांशी संवाद साधण्याच्या प्रक्रियेवरही परिणाम होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

# आदर्श लोकप्रतिनिधी रामभाऊ म्हाळगी



## निमित्त

रामचंद्र काशीनाथ म्हाळगी ऊर्फ रामभाऊ म्हाळगी हे आरएसएसचे प्रचारक होते. साधारणपणे १९५२ –५३ च्या सुमारास ते राजकारणात आले. सुरुवातीला भारतीय जनसंघ अर्थात आताचे भाजपच्या संघटनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. त्यांनी भारतीय जनसंघाच्या प्रचारासाठी आणि संघटात्मक बांधणीसाठी महाराष्ट्रभर प्रवास केला. आज रामभाऊ म्हाळगी यांचा जन्मदिन आहे.

रामभाऊ म्हाळगी यांचा जन्म ९ जुलै १९२१ रोजी पुणे जिल्ह्यातील कुडूस गावामध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जन्मगावी कुडूसमध्ये, तर माध्यमिक शिक्षण पुण्यात झाले. रामभाऊ विद्यार्थी दशेतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात आले. मद्रास व सोलापूर येथे त्यांनी संघ प्रचारक म्हणून काम केले. येथूनच त्यांच्या सार्वजनिक जीवनाला एका अर्थाने प्रारंभ झाला. पुढे त्यांनी गोवा विमोचन समितीच्या कार्यकारी समितीचे सचिव, संयुक्त महाराष्ट्र समितीच्या जनरल काउन्सिलचे सदस्य, महाराष्ट्र दुष्काळ निवारण समितीच्या जनरल काउन्सिलचे सदस्य म्हणूनही काम केले.

जनसंघाची स्थापना झाल्यावर महाराष्ट्राच्या विधानसभेत निवडून जाणारे ते पहिलेच आमदार होते. पुढे ते आपल्या कार्याच्या जोरावर जनसंघचे प्रदेशाध्यक्ष देखील बनले. त्यांची जडणघडणच संघाच्या मुशीत झाले. त्यांच्यावर विद्यार्थी दशेतच संघाचे संस्कार झाले. महाराष्ट्रात संघाची विचारसरणी रुजवण्यात रामभाऊ म्हाळगींचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या ठाई असलेली अभ्यासू वृत्ती. सुसंस्कृतपणा व साधेपणामुळे त्यांना जनसंघाचे द्रोणाचर्य म्हणून ओळखले जायचे. सत्तरच्या दशकात जनसंघाचे केवळ चारच आमदार विधानसभेत होते. त्यामध्ये रामभाऊ म्हाळगी यांचा समावेश होतो.

जनसंघाचे जरी चारच आमदार असले तरीदेखील रामभाऊ म्हाळगी यांचा त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणामुळे विधनसभेत मोठा दबदबा होता. पुण्याहून निवडून गेलेले रामभाऊ म्हाळगी हे बोलू लागले की, सर्व सभागृह शांत असायचे. त्यांच्या भाषणात कधीही गोंधळ होत नव्हता.

कुशल संसदपटू आदर्श लोकप्रतिनिधी आणि तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते यासोबतच संघ प्रचारक म्हणून रामभाऊ म्हाळगी यांना ओळखले जायचे. ते १९५७, १९६७ आणि १९७२ असे तीन वेळा भारतीय जनसंघाकडून विधानसभेत आमदार तर १९७७ व १९८० असे दोन वेळा ठाणे मतदारसंघातून लोकसभेचे खासदार म्हणून निवडून गेले. याचसोबत ते मध्य रेल्वे स्टेशन मास्टर्स संघटनेचे उपाध्यक्ष आणि पुणे बार काउंन्सिलचे उपाध्यक्षदेखील होते.

रामभाऊ म्हाळगी हे आरएसएस विचारवंत आणि भाजप नेते दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रभावाखाली होते, ज्यांनी सरकार नेतृत्व इच्छुक आणि भारतातील सध्याच्या सरकार नेत्यांसाठी शिक्षण संस्थेची कल्पना मांडली होती १९८२मध्ये प्रमोद महाजन यांनी भाईंदरजवळील उत्तन गावात केशव सृष्टी कॅम्पसमध्ये रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी उघडली संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेने आरएमपीला विशेष सल्लागार दर्जा दिला आहे.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# कांद्याच्या रसाचेही आहेत चमत्कारिक फायदे

कांद्याच्या रसाचे आरोग्यासाठी अद्वितीय फायदे: हृदयरोग, मधुमेह आणि कर्करोगाचा धोका कमी अनेक संशोधनांमध्ये, कांद्याचा रस अनेक आरोग्य समस्या दूर करण्यास उपयुक्त असल्याचे म्हटले गेले आहे. खरंतर, कांदा केवळ पोषक तत्वांनीसमृद्ध नसतो, तर त्याचे अँटी–ऑक्सिडंट, अँटी–इंफ्लेमेटरी आणि अँटी–बॅक्टेरियल गुणधर्म देखील त्याला एक नैसर्गिक औषध बनवतात.



**आजारांचा धोका कमी**

कांद्यामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, फोलेट, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि क्वेर्सेटिन आणि ॲलिल प्रोपाइल डायसल्फाइड सारख्या सल्फर संयुगे भरपूर प्रमाणात असतात. कांद्यामध्ये असलेले अँटी–ऑक्सिडंट्स शरीरातील मुक्त रॅडिकल्स नष्ट करतात, ज्यामुळे हृदयरोग, कर्करोग आणि मधुमेह यांसारख्या आजारांचा धोका कमी होतो.

**नैसर्गिक डिटॉक्सिफायर**

कांद्याचा रस हा एक नैसर्गिक डिटॉक्सिफायर आहे. तो केवळ पचनसंस्था मजबूत करत नाही तर रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास देखील मदत करतो. तथापि, ते संतुलित प्रमाणात घेणे महत्वाचे आहे.

**साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी प्रभावी**

कांद्याचा रस रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी प्रभावी आहे. कांद्याचा रस मधुमेही रुग्णांमध्ये हायपरग्लाइसेमिया नियंत्रित करण्यास मदत करतो. त्यात असलेले ॲलिल प्रोपाइल डायसल्फाइड इन्सुलिन संवेदनशीलता वाढवते आणि ग्लुकोजची पातळी स्थिर ठेवते.

**हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर**

कांद्यामध्ये असलेले क्वेरसेटिन आणि इतर अँटी–ऑक्सिडंट्स हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. कांद्याचे नियमित सेवन केल्याने एलडीएल (वाईट) कोलेस्ट्रॉल आणि सिस्टोलिक रक्तदाब कमी होतो, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. कांद्याचा रस रक्तातील होमोसिस्टीनची पातळी कमी करतो, जी हृदयाच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकते.

केस गळणे थांबवण्यास होते मदत कांद्यामध्ये असलेले अँटी–बॅक्टेरियल गुणधर्म केस गळणे थांबवतात. स्कॅल्प इन्फेक्शनमुळे केस गळतात. कांद्याच्या रसामध्ये सल्फर असते, जे हा संसर्ग दूर करते आणि केस गळणे थांबवते.

# रोहा तालुक्यात पावसाचे थैमान सुरुच; कुंडलिका नदीला पूर, अष्टमी शहर पाण्यात

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात रात्रभर मुसळधार पाऊस पडला आहे. त्यामुळे कुंडलिका नदीला पूर आला आहे. रोहा तालुक्यातील कुंडलिका व अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली होती. त्यामुळे संपूर्ण परिसर पाणीमय झाल्याचे चित्र तालुक्यात पाहावयास मिळत आहे. तालुक्यातील संपूर्ण नदीनाले तुडुंब भरून वाहत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. कुंडलिका नदीला पूर आल्यामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले.

कुंडलिका नदीला पूर आल्यामुळे अष्टमी शहर व रोहा शहराच्या काही भागांमध्ये पाणी शिरले होते. अष्टमीकरांनी रात्र जागुन काढली आहे. अष्टमी शहर पुराच्या पाण्याने वेढलेला होते. रोह्याशी त्यांचा संपर्क तुटला होता. रोहा अष्टमीला जोडणारा जुना पूल पाण्याखाली गेला आहे. तर मोठ्या मुलाच्या दोन्ही बाजूंनी पाणी असल्याने हा पुल सध्या रहदारीला बंद करण्यात आला आहे. त्यामुळे नागोठणे, पाली, मुंबई, अलिबाग याकडे जाणाऱ्या प्रवासांचे हाल झाले आहे. संपूर्ण रहदारी बंद आहे, दुसरीकडे रोहा कोलाड मार्ग ही सध्या बंद आहे त्यामुळे रोहयातुन तळ कोकणात ही नागरिकांना जाता येत नाही.

रोहा शहरातील कुंडलिक नदीच्या काठावर असलेल्या नागरी वस्तीत पाणी शिरले आहे.रोहा शहरातील दमखाडी, शहरा जीक असलेल्या भुवनेश्वर व रोठखुर्द नागरीवस्तीत पाणी शिरले आहे.

अष्टमी शहरात, दमखाडी परीसर, रोहा कोलाड मार्गावर पाणी होते. नागरिकांचे हाल झाले असुन नगरपरिषदेकडून मदतीचा हात पुढे करण्यात येत होत. तालुक्यातील कुंडलिका नदीच्या काठावर असलेल्या गावातही पाणी शिरले आहे. मध्यरात्रीपासून कुंडलिका नदीमध्ये पाणी वाढण्यास सुरुवात झाली पाण्याचा प्रवाह मोठा असल्यामुळे नागरी वस्तीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याचे चित्र रोहा तालुक्यात होते. रेस्क्यू टीम रात्रभर तालुक्यातील ठीक ठिकाणी नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवत आहेत.नगराध्यक्ष वनश्री शेडगे व त्यांच्या टीमने बोटीने अष्टमी शहरातील पाण्याची पाहणी केली आहे. सामाजिक संस्था व रेस्क्यू टीम तैनात करण्यात आले होते.अडकलेल्या नागरिकांना रेस्क्यू टीम कडून बाहेर काढण्याचे काम चालू होते. एसव्हीएसएसआर, एनव्हीएस एस आर, नगरपरिषद व पोलीस यंत्रणा सतर्क होते.

कुंडलिका नदीला पूर आल्यामुळे रोहा कोलाड मार्गावर रस्त्यावर पाणी आले आहे. त्यामुळे या मार्गावरील प्रवासी वाहतूक बंद झाली आहे. एसटी बसेस नवरत्न हॉटेल जवळ थांबवण्यात आले होते. या मार्गावरच धाटाव औद्योगिक क्षेत्र असल्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कारखाने आहेत या कारखान्यात जाणारा कामगारांचे मोठया प्रमाणावर हाल झाले. धाटाव औद्योगिक क्षेत्रातील काम जाणाऱ्या बहुतांशी कामगारांना रस्त्यावर आलेल्या पाण्यामुळे कामावर जाता आले नाही.

रोहा कोलाड मार्ग बंद असल्यामुळे महाड व तळ कोकणात जाणाऱ्या प्रवासांचेही हाल झाले आहेत. दुसरीकडे पाण्यामुळे रेल्वे स्टेशनला जाता येत नसल्यामुळे प्रवाशांना रेल्वेनी ही जाता येत आले नाही. नागोठणे, रोहा कोलाड मार्ग बंद असल्याने कामगारांचे हाल झाले असुन नुकसान सुध्दा झाले त्यांना पुरा मुळे कामावर जात नसल्यामुळे त्यांची रजा लागली आहे. नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, सभापती राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, मयुर दिवेकर, निता हजारे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, पोलीस निरीक्षक मारुती




पाटील, नायब तहसीलदार राजेश थोरे प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन परीस्थिती वर लक्ष ठेवून आहेत. खा. सुनील तटकरे, ना. आदिती तटकरे व आ. अनिकेत तटकरे पूर परिस्थितीकडे लक्ष ठेवून आहेत. अधिकाऱ्यांना योग्य सूचना दिल्या आहेत. त्यांनी पुरात अडकलेल्या नागरीकांना बाहेर काढण्यासाठी तात्काळ बोटींची व्यवस्था करण्यात आली आहे.

## डिकसळमध्ये मोरी बुजवल्याने पाणी रस्त्यावर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-कल्याण मार्गावर दिवसरात्र मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. मात्र गेल्या चार ते पाच दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे रायगड हॉस्पिटल गेटच्या पुढील बाजूस रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या ठिकाणी पूर्वी पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी मोऱ्या टाकण्यात आल्या होत्या, मात्र संबंधित ठेकेदाराने रस्त्याचे काम करताना या मोऱ्या बंद केल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी समोरील डोंगरावरून येणाऱ्या पावसाच्या पाण्याला निचऱ्याचा मार्ग उपलब्ध नसल्याने ते थेट रस्त्यावर साचत आहे.

रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे वाहनचालकांना आपली वाहने अतिशय सावधगिरीने चालवावी लागत आहेत. रात्री पाण्याची पातळी लक्षात न आल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. दुचाकी स्वारांसाठी ही परिस्थिती अधिकच धोकादायक ठरत असून एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.


**पेण नगर परिषद, पेण**

**निविदा सूचना सन- २०२६-२०२७**

पेण नगरपरिषद, पेण जि. रायगड यांजकडून खालील कामासाठी अनुभवी व इच्छुक विद्युत परवानाधारकांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | मा. सभापती क्रीडा व शिक्षण व बांधकाम विभाग रचना सहाय्यक यांच्या दालनामध्ये वातानुकुलीत यंत्रणा बसविणेबाबत. | १,७४,७५१/- | रु. २,०००/- | ५००/- |

**-: कामाच्या अटी व शर्ती :-**

१. निविदा विक्रीचा कालावधीः दिनांक ०९/०७/२०२५ ते १६/०७/२०२५ पर्यंत पेण नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी १०.०० ते सांय ५.३० वाजेपर्यंत.
२. सदरच्या सीलबंद निविदा कार्यालयीन वेळेत दिनांक १७/०७/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत सादर करता येतील. व निविदा शक्यतो त्याच दिवशी ठेकेदार यांच्या समक्ष सकाळी ३.३० वाजता उघडण्यात येतील किंवा प्रशासकीय वेळेत उघडण्यात येतील.
३. सदर कामाबाबत विस्तृत माहिती कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवसाखेरीज नगरपरिषद कार्यालयात विद्युत विभागात मिळेल

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**पेण नगरपरिषद, पेण**



**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

दुरध्वनी क्र- ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालयः ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालयः ०२२-७५४२३३९
ईमेलः panvelcorporation@gmail.com
वेबसाईटः panvelcorporation.maharashtra.gov.in

जा.क्र.- पमपा/मातंवि/२१२६/प्र.क्र.०९/१७७/२०२६ दिनांक : ८/७/२०२६

**जाहीर निविदा सूचना**

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | PMC/IT/03/2026 | पनवेल महानगरपालिका क्रिकेट अकॅडमी येथे सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षा यंत्रणा बसविणेबाबत. |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती शासनाच्या www.mahatenders.com या संकेतस्थळावर दि. ९ / ७/२०२६ ते दि. २३/७/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजे पर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदाधाराकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.१९८/२१०/२०२६
दिनांक : ०८/०७/२०२६

**सही/-**
उप आयुक्त (मातंवि)
पनवेल महानगरपालिका


## मुसळधार पावसात सुधागडच्या धोंडसे येथे दरड कोसळली



**पाली : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे सुधागड तालुक्यातील धोंडसे गाव ते स्मशानभूमी रस्त्यावर मोठी दरड कोसळल्याची घटना घडली आहे. या दरड कोसळण्याच्या घटनेत सुदैवाने कोणतीही जिवितहानी झालेली नाही, अशी माहिती पाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी दिली. जोरदार पावसाने धोंडसे गावाजवळील टेकडीवरून माती आणि दगडांचा मोठा ढिगारा थेट रस्त्यावर येऊन पडला. दरड कोसळल्याने रस्त्यावर असलेला विजेचा खांबही कोसळला आहे. विजेचा खांब कोसळल्यामुळे गावातील पाणीपुरवठा यंत्रणा बंद पडली असून पिण्याच्या पाण्याची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे.

या दरड कोसळलेल्या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. सध्या धोंडसे गावचे सरपंच आणि पोलीस पाटील घटनास्थळी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. रस्ता मोकळा करण्यासाठी आणि पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रशासनाकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

## दरडग्रस्त वरंध आदिवासीवाडीतील ७५ कुटुंबांना जीवनावश्यक शिधावाटप



**माणगाव : प्रतिनिधी**

महाड तालुक्यात ४ जुलै रोजी झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे वरंध येथील आदिवासीवाडीवर दरड कोसळून भीषण दुर्घटना घडली. या दुर्घटनेत अनेक घरे जमीनदोस्त झाली असून संपूर्ण वाडीच धोक्याच्या छायेत आली आहे. या वाडीतील सुमारे ७५हून अधिक आदिवासी कुटुंबांना घरे सोडून सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे लागले.

या अनुषंगाने ७ जुलै रोजी वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष वरंध आदिवासी वाडीला भेट देत सर्व ७५ कुटुंबांना तांदूळ, डाळ, तेल, साखर तसेच अन्य जीवनावश्यक शिधा साहित्याचे वाटप केले. दरडीच्या भीतीमुळे सर्व कुटुंबांनी जवळपास दीड किलोमीटर अंतरावरील एका पोल्ट्री फार्मच्या शेडमध्ये आश्रय घेतला आहे. गेल्या दोन दिवसांपासून लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक अत्यंत मर्यादित सुविधांमध्ये राहत असून त्यांच्यासमोर अन्न, कपडे, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तूंची मोठी समस्या निर्माण झाली आहे.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र.२२ /२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक ०३/०७/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक हिंदूस्थान टाईम्स, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितरक्कम |
|---|---|---|
| १ | दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्रात 'Critical Mineral Processing Park' विकसित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विनंती अर्ज (RFP). | -- |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २०/०७/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १४/०७/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक २३/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | रानसई पाणीपुरवठा योजना.. रानसई धरणाच्या ओव्हरफ्लो विभागाची विशेष दुरुस्ती करणे, ऊर्जा क्षय व्यवस्था, गाईड भिंत बांधणे, रानसई धरणाच्या ड्रेनेज पाइपलाइन स्थलांतरीत करणे व विस्तार करणे. | ₹ २४,८०,००,५०१.०० |
| २. | मुंबईतील नरीमन पॉईट येथील, एक्सप्रेस टॉवर इमारती मधील, तळ मजल्यावरील मा. उद्योग मंत्री यांच्या कार्यालयाच्या नुतनीकरणासाठी डिझाइन आणि बांधकाम संकल्पना... अस्तित्वातील बांधकामाचे पुनः बांधकाम करणे, प्लंबिंगची कामे, रंगकाम, सुतारकाम, दरवाजे व खिडक्यांची कामे, फॉल्स सिलिंग, किरकोळ फर्निचर, खुर्च्या, अग्निशामक अलार्म व अग्निशमन यंत्रणा, सिसिटिव्हि, डेटा व्हॉईस व उंदिर प्रतिबंध यंत्रणा, एचव्हिएसी प्रणाली, ईपिएबिएक्स प्रणाली, ऑडिओ, व्हिडीओ प्रणालीचा पुरवठा करणे, उभारणे व कार्यान्वित करणे. | ₹ ६,९९,९७,८३२.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १३/०७/२०२६ ते दिनांक ०७/०८/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २०/०७/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २८/०७/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



**जाहीर सूचना**

सर्व संबंधित व्यक्ती, अधिकृत रहिवाशी, पर्यावरण विषयक मंडळे, एन.जी.ओ. आणि इतर यांना या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येते कि राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण महाराष्ट्र राज्य यांनी खालील वसाहत बांधकामासाठी पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे. मेसर्स **ओरिअन ट्रस्ट,** महाराष्ट्र यांच्या व्यावसायिक व गृह संकुलच्या गट नं-१५/१/१,१६/१, १७/१,१७/२,१७/३,१७/४,१७/५,१७/६,१८/१/२/अ,१८/१/२ /ब, १८/३,१८/४,२०/अ, ३२/अ, ३३/१,३५/४,८३/१ आणि ८३/२ **गाव - हरिग्राम, तालुका - पनवेल, जिल्हा- रायगड महाराष्ट्राच्या खाली पत्र क्र. EC२६C३८०३MH५७७७३६८N फाईल क्रमांक SIA/MH/ INFRA२/५७३८०३/२०२६ दिनांक ०५/०७/२०२६.**

सदर पत्राच्या प्रति महाराष्ट्र शासन, पर्यावरण अनुमती विभाग, मंत्रालय व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे https:// parivesh.nic.in/ या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या वेबसाईटवर पाहू शकता.

**सही/-**
**संचालक**
**मेसर्स ओरिअन ट्रस्ट**
**पत्ताः- १, पर्ल मॅन्शन (उत्तर), ९१ महर्षी कर्वे रोड, मरीन लाइन्स, मुंबई ४०० ०२० महाराष्ट्र**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पळस्पे, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली बिनशेती मिळकत विद्यमान कब्जेदार नजुनदप्पा पूष्पा यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर बिनशेती मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणेः-

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**
**मौजे पळस्पे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील**
**मे. दुय्यम निबंधक पनवेल यांत्ते अधीकार क्षेत्रातील.**

| गट क. | उपविभाग | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| ९२ | ६ | १०२० चौ.मी | १०२.०० |

वरील बिनशेती मिळकती बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०८/०७/२०२६**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी. बी.ए.एल.**

कार्यालयीन पत्ता :- गाळा क. १५४ महानगरपालीका कॉम्पलेक्स तहसिलदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.,
संपर्कः- ८८८८२७१७५९



**प्रमाणपत्र हरवले आहे**

माझे डॉ. विकास पद्माकर राव गंडाळ या नावाचे एम.बी.बी.एस चे पासिंग प्रमाण पत्र, पदवी प्रमाणपत्र बीड ते मुंबई या प्रवासात हरविले आहे. कृपया कुणास सापडल्यास खालील पत्यावर आणून द्यावे ही विनंती.

**सही/-**
**डॉ. विकास गंडाळ**
**१०३ पहिला मजला बांठिया हाऊस**
**एम.जी. रोड ओल्ड पनवेल ४१०२०६**
**मो. ९५९४९८१०५६**

# दमदार पावसाने कोकणातील धरणे भरली

## ठाणे ते सिंधुदुर्गात जलसाठ्यात विक्रमी वाढ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

चालू मान्सून हंगामात झालेल्या दमदार पावसामुळे कोकण विभागातील प्रमुख धरणांमधील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. जलसंपदा विभागाने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील लहान-मोठ्या धरणांमध्ये उपयुक्त पाणीसाठा समाधानकारक पातळीवर पोहचला असून अनेक धरणांतून पाण्याचा विसर्गही सुरू आहे.

ठाणे जिल्ह्यातील प्रमुख मोठ्या धरणांमध्ये मुबलक जलसाठा जमा झाला आहे. यामध्ये भातसा प्रकल्पामध्ये तब्बल ४८०.२६ दशलक्ष घनमीटर (दलघमी) इतका उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. त्याखालोखाल बारवी प्रकल्पामध्ये १५१.६४ दलघमी पाणीसाठा असून तानसा धरणामध्ये १००.६१४ दलघमी जलसाठा नोंदवला गेला आहे. तसेच मोडकसागर या मोठ्या प्रकल्पात ९३.०३ दलघमी उपयुक्त पाणीसाठा जमा झाला असून ठाणे



जिल्ह्यातील धरणांची ही स्थिती आगामी पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने अत्यंत सुरक्षित मानली जात आहे.

पालघर जिल्ह्यातील धामणी या मोठ्या प्रकल्पामध्ये सध्या १५६.४ दलघमी इतका उपयुक्त जलसाठा उपलब्ध असून कवडास प्रकल्पात ८.२ दलघमी पाणीसाठा जमा झाला आहे. रायगड जिल्ह्यात हेटवणे प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ५.१२ टीएमसी इतकी असून हा प्रकल्प आजघडीला तब्बल ७१.८० टक्के भरला आहे. याशिवाय जिल्ह्यातील एकूण २८ लघु प्रकल्पांपैकी ११ लघु प्रकल्प पूर्ण क्षमतेने म्हणजेच १०० टक्के भरून ओसंडून वाहत आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये पाण्याची आवक वाढल्याने धरणांची सुरक्षा म्हणून पाण्याचा विसर्ग सुरू करावा लागला आहे. जिल्ह्यातील गडनदी मध्यम प्रकल्पामध्ये ६६.३९ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध असून या धरणातून सध्या ८४.१६ घमी प्रतिसेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. अर्जुना प्रकल्पात ५०.२५४ दशलक्ष घनमीटर साठा झाला असून नातूवाडी मध्यम प्रकल्पामध्ये १८.३७७ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा जमा झाला आहे. नातूवाडी धरणाची पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी सध्या २५.७७६ घमी प्रतिसेकंद वेगाने विसर्ग केला जात आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात तिलारी प्रकल्पामध्ये तब्बल ४४७.३६९ दलघमी इतका अथांग उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. अरुणा धरणात ९२.०२५ दलघमी साठा असून तेथून २०.२ घमी प्रतिसेकंद वेगाने विसर्ग सुरू आहे. कोर्ले-सातंडी मध्यम प्रकल्पात २५.४७४ दलघमी पाणीसाठा असून तेथून सर्वाधिक म्हणजेच ८९.१३ घमी प्रतिसेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे तसेच देवघर मध्यम प्रकल्पामध्ये ९८.०२ दलघमी उपयुक्त पाणीसाठा जमा झाला असून येथील विसर्ग सध्या निरंक आहे.

# रसायनीला मुसळधार पावसाचा फटका; जनजीवन विस्कळीत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरात गेल्या तीन दिवस सुरु असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत केले असून नविन पोसरी मोहोपाडा येथील जय प्रेसिजन कंपनीमागील परिसरात वाढणाऱ्या पाण्याचा प्रवाहामुळे भिंत कोसळली, तर मोहोपाडा येथील स्मशानभूमी परिसरात डोंगरावरील माती वाहून आल्याने भराव तयार झाला.

रसायनी स्टेट बँक समोरील फिडरवर झाड कोसळले तसेच मोहोपाडा थांबा, वीज वितरण कार्यालयासमोरील एमआयडीसी रायगड को. हौसिंग सोसायटी, एचओसी कॉलनी गेटजवळ, मोहोपाडा रिक्षा थांबा, कांबे थांबा रस्तालगत, रसायनी परिसरातील अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या उन्मळून पडल्या.



त्यामुळे सोमवारी पहाटेपासून मंगळवार दुपारपर्यंत ३० तास वीजपुरवठा खंडीत होता. वीज वितरण कर्मचाऱ्यांनाही शर्थीचे प्रयत्न करावे लागले.

मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदीनाले दुथडी भरून वाहत आहेत. सिध्देश्वरी कराडे परिसरात, रिलायन्स इंडस्ट्रीज कंपनीसमोर पाणी रस्त्यावर आल्याचे दिसून आले. रसायनी परिसरात ठिकठिकाणी पाणी साचले असून रस्त्यांचीही चाळण झाल्याचे दिसून आले.

# नवी मुंबईतील स्मशानभूमींचे आधुनिकीकरण करावे

## आमदार मंदा म्हात्रे यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका आणि सिडको हद्दीतील स्मशानभूमींचे सर्वांगीण नूतनीकरण आणि आधुनिकीकरण करून नागरिकांना सन्मानपूर्वक व दर्जेदार सुविधा द्याव्यात. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करावी, अशी मागणी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



नवी मुंबई नियोजनबद्ध शहर असले तरी महानगरपालिका व सिडको हद्दीतील स्मशानभूमींमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव आहे. काही ठिकाणी दुरुस्ती, नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाची तातडीची गरज आहे. अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि आवश्यक सुविधा मिळणे ही काळाची गरज असल्याचे आमदार म्हात्रे यांनी म्हटले. गावांतील पारंपरिक स्मशानभूमींवर सिडको वसाहती, झोपडपट्ट्या आणि इतर निवासी भागातील नागरिकांचा भार वाढला आहे. त्यामुळे सध्याच्या सुविधा अपुऱ्या ठरत आहेत. वाढत्या लोकसंख्येचा विचार करून सर्व स्मशानभूमींचा विकास आराखडा तयार करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

स्मशानभूमींच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करून नवी मुंबईत पर्यावरणपूरक स्मशानभूमी विकसित कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका, सिडको व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंतीही आमदार मंदा म्हात्रे यांनी ग्रामविकास मंत्री गोरे यांना केली आहे.

# आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची पावसाळी पाहणी

## झाडे हटवणे आणि रस्ते दुरुस्तीला गती

**नवी मुंबई : बातमीदार**

मागील चार ते पाच दिवस नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी झाली. ताशी ६० ते ७० कि.मी. वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात झाडांची पडझड झाली. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी बुधवारी (दि. ८) दिघा ते बेलापूरपर्यंत क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी केली आणि पाणी साचण्याच्या कारणांवर तातडीच्या उपाययोजनांच्या सूचना दिल्या.



पावसाच्या काळात आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष आणि विभागीय कक्षांना प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने मदत यंत्रणा अथक कार्यरत होती. आयुक्त स्वतः सर्व परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून होते. महापे-शिळफाटा मार्गावर एल अँड टीजवळील उड्डाणपुलाखाली दक्षिणोत्तर जाणारी नाली पूर्णपणे बंद झाल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. यावर हॉरिझॉन्टल ड्रिलिंग मशिन या अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून नाली सफाईचे काम सुरू करण्यात आले. पावसाने उघडीप दिली असल्याने हे काम जलदगतीने पूर्ण करावे, असे निर्देश आयुक्तांनी दिले. एमआयडीसी परिसरात रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या ड्रेनेज लाईनवर अतिरिक्त विटांचे बांधकाम केल्याने पाण्याचा निचरा अडथळा निर्माण झाला होता. ड्रेनेजच्या वर केलेले बांधकाम तोडून लाईन मोकळी करण्याचे आदेशही देण्यात आले.

ऐरोलीतील टी जंक्शन हा भाग सखल असल्याने तेथे पंपांची संख्या वाढवणे आणि ड्रेन होलची संख्या व आकारमान वाढवण्याच्या सूचना करण्यात आल्या. जुईनगर-सानपाडा अंडरपासमध्ये पाणी उपसा पंपांची संख्या वाढवावी, तसेच सायन-पनवेल महामार्गावरील एलपी जंक्शनजवळ ड्रेन होलचा आकार वाढवावा, असेही सांगण्यात आले. वादळी वाऱ्यामुळे पडलेल्या झाडांच्या फांद्यांची कटाई आणि उचलण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मनुष्यबळ वाढवून हे काम जलद करण्याचे निर्देश दिले. पडण्याची शक्यता असलेली वाकलेली झाडेही तातडीने हटवावीत, असे सांगण्यात आले. पावसाची उघडीप मिळताच रस्त्यावरील खड्डे भरून दुरुस्तीचे काम वेगाने करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. नागरिकांच्या सुरक्षेसाठी गवळीदेवसारख्या ठिकाणी उंच बॅरिकेटिंग आणि प्रवेश प्रतिबंधाचे फलक लावण्याचे आदेश दिले. तसेच सर्व मॅनहोलवर झाकणे आहेत की नाही याची खातरजमा करण्यास सांगत यात कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट केले.

सेक्टर ९ कोपरखैरणे येथील वॉटर एन्ट्रीज मोठ्या करणे, ग्रीनवर्ल्ड दिघा चौकात रस्ते सुधारणा, वाशीगाव मागील नवीन अंडरपासमध्ये अतिरिक्त पंपांची व्यवस्था यांच्या सूचना देण्यात आल्या. उरण फाटा, सीबीडी बेलापूर, आरबीआय कॉलनी, एमपीएससी कार्यालयाजवळील परिसर, अपोलो हॉस्पिटलसमोरील चौक आणि सेक्टर १२ पंपिंग हाऊस यांचीही पाहणी करण्यात आली. पावसामुळे रस्त्यावर वाहून आलेली माती तातडीने उचलून स्वच्छतेवर भर द्यावा, असेही आयुक्तांनी सांगितले. या पाहणी दौऱ्यात घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे, आपत्ती व्यवस्थापन उपायुक्त स्मिता काळे, परिमंडळ २ चे उपआयुक्त नैनेश बदले तसेच संबंधित विभागांचे सहायक आयुक्त आणि कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

मुसळधार पाऊस आणि वादळाच्या काळात मैदानावर कार्यरत असलेल्या महापालिका यंत्रणेला नागरिकांनी सहकार्य केले, त्याबद्दल आयुक्तांनी आभार मानले. हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला असल्याने नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये. तसेच वादळी वाऱ्यामुळे झाडे पडण्याची शक्यता असल्याने झाडाखाली उभे राहू नये आणि वाहने पार्क करू नयेत, असे आवाहनही डॉ. कैलास शिंदे यांनी केले.

# नवी मुंबई शहरात पाणीकपात कायम, दिलासा देण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यापासून नवी मुंबईसह परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मोरबे धरणातील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. धरणातील पाणीसाठा आजमितीला सुमारे ५५ टक्क्यांपर्यंत पोहचला असून पावसाचा जोर अद्यापही कायम आहे. त्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्याची परिस्थिती मोठ्या प्रमाणात सुधारली असतानाही नवी मुंबई महानगरपालिकेकडून लागू करण्यात आलेली पाणीकपात अद्याप रद्द करण्यात आली नाही.



सध्या शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना केवळ एक तासच पाणीपुरवठा होत असल्याने दैनंदिन जीवनावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. घरगुती कामे, पिण्याचे पाणी साठविणे तसेच इतर आवश्यक गरजा भागविण्यासाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पाणीकपात तातडीने मागे घेण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे महादेव पवार यांनी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना निवेदन सादर करून पाणीकपात तत्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

मोरबे धरणातील पाणीसाठा समाधानकारक पातळीवर पोहोचत असताना शहरात पाणीकपात कायम ठेवणे योग्य नसल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. तसेच नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन पूर्वीप्रमाणे नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा तातडीने सुरू करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. सध्याच्या पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याने महानगरपालिकेने परिस्थितीचा आढावा घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, शहरातील नागरिकांमध्येही पाणीकपात त्वरित रद्द करून नियमित पाणीपुरवठा पूर्ववत करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आता महानगरपालिका प्रशासन याबत कोणता निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मिसिंग लिंक दुर्घटना : नवी मुंबईतील तीन तरुणांच्या सतर्कतेने बचावले अनेक जीव!





**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे मिसिंग लिंक बोगद्याजवळ सोमवारी पहाटे दरड कोसळून मोठी दुर्घटना घडली, मात्र अवघ्या १०-१५ फुटांवर असलेल्या नवी मुंबईतील तीन तरुणांनी प्रसंगावधान राखून इमर्जन्सी बटण दाबून कंट्रोल रूमला माहिती दिली. त्यामुळे मागून येणारी वाहने थांबवण्यात आली आणि मोठा अनर्थ टळला.

नवी मुंबईतील नेरुळ सेक्टर-१० येथील रहिवासी संदेश खरात (२४), अक्षय लांडगे (३२) आणि रोशन सरगर (२२) हे सोमवारी पहाटे कुटुंबीयांसह कारने मुंबईच्या दिशेने जात होते. पहाटे सुमारे ३ वाजता त्यांची कार मिसिंग लिंक बोगद्याजवळ पोहचली. बोगद्याच्या परिसरात वरून पाणी झिरपत होते आणि लहान दगड कोसळत होते. परिस्थिती असामान्य वाटल्याने त्यांनी वाहन थांबवून निरीक्षण करण्याचा निर्णय घेतला. पुढे काय झाले आहे हे पाहण्यासाठी तिघेही वाहनातून खाली उतरले. ते बोगद्याच्या प्रवेशद्वारापासून अवघ्या १० ते १५ फुटांवर असतानाच अचानक मोठा दगड कोसळला.

त्यानंतर काही क्षणातच प्रवेशद्वारावरील कमान कोसळून माती, दगड आणि पाण्याचा मोठा लोंढा रस्त्यावर पसरला. क्षणार्धात संपूर्ण मार्ग बंद झाला. प्रसंगाचे गांभीर्य ओळखून तिघांनी तातडीने बोगद्यातील इमर्जन्सी बटण दाबून कंट्रोल रूमला माहिती दिली. त्याचबरोबर मागून येणाऱ्या वाहनांना हातवारे करून थांबवले आणि पुढे न जाण्याचा इशारा दिला. काही वेळातच वाहतूक वळवण्याची प्रक्रिया सुरू झाली आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली.

समोर एखादे वाहन अडकले आहे का, या भीतीने त्यांनी काही अंतर चालत जाऊन पाहणीही केली, मात्र वरून सातत्याने दगड कोसळत असल्याने अधिक वेळ थांबणे धोकादायक असल्याचे लक्षात येताच ते मागे फिरले. या दुर्घटनेनंतर मिसिंग लिंकमधून पुन्हा प्रवास करताना भीती वाटते, असे तिघांनी सांगितले. अशा संवेदनशील बोगद्यांमध्ये केवळ इमर्जन्सी बटण पुरेसे नसून प्रत्येक १ ते १.५ किलोमीटर अंतरावर आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी कर्मचारी तैनात असावेत, अशी मागणीही त्यांनी केली. दरड कोसळल्यानंतर मार्गावरील वाहतूक आता सुरळीत झाली आहे.

# भाजप महामंत्री निलेश म्हात्रे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

वाढदिवस हा केवळ आनंदोत्सव न राहता समाजसेवेची संधी ठरावा, या भावनेतून नवी मुंबई भाजपचे महामंत्री आणि माजी नगरसेवक निलेश म्हात्रे यांचा वाढदिवस बुधवारी (दि. ८) विविध सेवाभावी उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

आमदार मंदा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमांतून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. समाजसेवक मनोज मेहेर आणि संदीप मेहेर यांच्या वतीने नेरूळ विभागातील सारसोळे गावातील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले विद्यालय, शाळा क्र. १२ येथे बालवाडीतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू नागरिकांना ब्लँकेटचे वितरणही करण्यात आले. शिक्षणाला प्रोत्साहन देणे, गरजूंना आधार देणे आणि समाजातील प्रत्येक घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवणे, हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

जनतेचा विश्वास आणि आशीर्वाद हेच सार्वजनिक जीवनातील सर्वात मोठे बळ आहे. समाजहिताची वाटचाल यापुढेही अविरत सुरू राहील, अशी प्रतिक्रिया निलेश म्हात्रे यांनी व्यक्त केली. दुसऱ्या उपक्रमांतर्गत आमदार मंदा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे आणि भाजप कार्यकर्त्यांच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी रुग्णांची विचारपूस करून त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. समाजसेवेचा संदेश देणाऱ्या या दोन्ही उपक्रमांमुळे वाढदिवसाला प्रेरणादायी आणि लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले.

शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर संगम या उपक्रमांतून पाहायला मिळाला. यावेळी मंगेश चव्हाण, नितीन खंदारी, मुकुंद विश्वासराव, जयंत पाटील, प्रवीण भगत, प्रवीण चिकणे, भरत मावळे, जिनेंद्र त्रिपाठी, मालती सोनी, कविता कटकधोंड यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिघा परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करा; नवीन गवतेंची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

दिघा विभागातील विविध सोसायट्यांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत नवी मुंबई महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती नवीन गवते यांनी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

पार्थ लेक फ्रंट टॉवर, बिंदू माधवनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर तसेच जनेश्वर नगर या परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार होणाऱ्या या बिघाडामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. नवीन गवते यांनी दिलेल्या निवेदनात महावितरणने संबंधित परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी केली.

भविष्यात अशा प्रकारची समस्या उद्भवू नये यासाठी वीज यंत्रणा अधिक सक्षम करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी म्हटले आहे. या निवेदनावेळी चंद्राम सोनकांबळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



# पनवेलमध्ये रविवारी रक्तदान शिबिर

**नवीन पनवेल :** श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट, श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट पनवेल, विद्यार्थी वाहक संस्था पनवेल, पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघ, आम्ही रक्तदाते पनवेलचे, विश्वसिंधी सेवा संगम आणि पनवेल तालुका पत्रकार विकास मंच यांच्या सहकार्याने ३१व्या रक्तदान शिबिराचे आयोजन १२ जुलै रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत श्री पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर, मिश्राळी नाका, पनवेल येथे करण्यात आले आहे.

यावेळी अवयवदान विषयावर मार्गदर्शन केले जाईल. यावेळी इसीजी आणि रक्तशर्करा तपासणी करण्यात येणार आहे. या रक्तदान शिबिराला उपस्थित राहण्याचे आवाहन ॲडव्होकेट मनोहर सचदेव यांनी केले आहे.

# नेरळमध्ये शिरले पुराचे पाणी

## रेल्वेमार्गही जलमय; मध्य रेल्वेची सेवा पाच तास ठप्प

**नेरळ : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे कर्जत तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. नेरळजवळील मध्य रेल्वेच्या पाडा गेट परिसरात बुधवारी (दि. ८) पहाटे मोठ्या प्रमाणात पाणी रेल्वे रूळांवर आल्याने नेरळ-कर्जतदरम्यानची रेल्वेसेवा तब्बल पाच तास ठप्प झाली. दरम्यान, नेरळ पूर्वेतील चंचे चाळ परिसरात घरांमध्ये पाणी शिरल्याने साहित्याचे नुकसान झाले.





पहाटे सुमारे दोनच्या सुमारास पाडा गेट परिसरात अचानक पाण्याचा जोर वाढला आणि रेल्वे ट्रॅकवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले. काही वेळातच या पाण्याने नदीचे स्वरूप धारण केल्याने रेल्वे वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली. परिणामी पहाटे अडीच वाजताची मुंबईकडे जाणारी पहिली लोकलही रद्द झाली. सकाळी पाणी ओसरल्यानंतर रेल्वे वाहतूक हळूहळू सुरू करण्यात आली. त्यानंतरही काही गाड्या विलंबाने धावत होत्या. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. दुसरीकडे गेटजवळ उभारलेल्या रेल्वेच्या चौकीत ही पाणी शिरल्याने गेटमन प्राण वाचवून बाहेर आला.

या पावसाचा फटका नेरळ पूर्वेतील चंचे चाळ परिसरालाही बसला. अनेक घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झाले. पहाटे अचानक घरात पाणी शिरल्याने नागरिकांना जीव वाचवण्यासाठी धावपळ करावी लागली.

दरम्यान, रेल्वे प्रशासनाने जेसीबीच्या साहाय्याने पाण्याचा निचरा केल्यानंतर सकाळी सुमारे ८.१५ वाजता मुंबईच्या दिशेने पहिली लोकल धावली, मात्र रेल्वेसेवा पूर्णपणे सुरळीत होण्यासाठी काही वेळ लागणार असल्याचे सांगण्यात आले.

जेसीबीद्वारे निचऱ्याचे काम सुरू असताना परिसरातील पाणीपुरवठ्याची पाइपलाइन फुटल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. आधीच गेल्या तीन दिवसांपासून पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या नागरिकांवर आता आणखी मोठे पाणीसंकट ओढवण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# खोपोलीत पावसाची रिपरिप! विणानगरमधील रस्ता खचला

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहराला गेले दोन-तीन दिवस पावसाने झोडपले. त्यानंतर बुधवारी (दि.८) सकाळपासून खोपोलीत पावसाची बॅटिंग सुरूच झाली. सतत पडणाऱ्या पावसामुळे खोपोली शहरातून विणानगरकडे जाणारा रस्ता खचला असून या ठिकाणी नगर परिषदेने तातडीने दुरुस्ती करावी, अशी नागरिकांनी मागणी केली आहे.

खोपोली शहरातील अनेक सखल भागात आजही थोड्या प्रमाणात पाणी साचलेले पाहावयास मिळाले. बाजारपेठेतील हायको कॉर्नर करीब सिटी प्लस डेपोसमोरील रस्त्यावर पाणी वाहत होते. नगर परिषदेने या ठिकाणी बॅरिगेट लावून नागरिकांना सतर्क केले आहे. विणानगरकडे जाणारा रस्ता खचल्याने त्या ठिकाणी विद्युत पोलचे युद्धपातळीवर काम सुरू करण्यासाठी बत्ती गुल झाली होती.



## रोहा पालिकेकडून साफसफाई

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा व अष्टमी शहरात पुरामुळे जमा झालेला कचरा उचलण्याचे व साफसफाईचे काम नगर परिषदेकडून हाती घेण्यात आले आहे.

कुंडलिका नदीला पूर आल्यानंतर पाणी रोहा व अष्टमीत शिरते. त्यामुळे नागरिक, व्यापाऱ्यांचे नुकसान होऊन कचरा जमा होत असतो. परिणामी रोगराई होऊ नये यासाठी हा कचरा उचलण्याचे काम नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. यावेळी उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, गटनेते महेंद्र गुजर, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, नगरसेवक माज सवाल, प्रेषीत बारटक्के, स्वप्नील धनावडे, अखिल, भावेश, अब्बास रोहावाला, अधिकारी मनोज पुलेकर उपस्थित होते.



# रोह्यातील पूरपरिस्थितीचा बैठकीत आढावा

## नुकसानीचे पंचनामे तत्काळ करा; खासदार सुनील तटकरे यांचे निर्देश

**धाटाव : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे रोह्यात पूरस्थिती निर्माण होऊन रस्ते बंद झाले, शेती व मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. ७) रोहा येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित आढावा बैठकीत खासदार सुनील तटकरे यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत आपत्कालीन परिस्थितीत कोणत्याही प्रकारची दिरंगाई सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. नुकसानग्रस्त भागांचे तत्काळ सरसकट पंचनामे करून पात्र नागरिकांना विलंब न लावता शासकीय मदत उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.



यंदा पावसाला उशिरा सुरुवात झाली असली तरी अल्पावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे नागोठणे, सुकेळी, खिंड तसेच मुंबई-गोवा मार्गावरील अनेक ठिकाणी वाहतूक विस्कळीत झाली. प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, लोकप्रतिनिधी आणि सेवाभावी कार्यकर्त्यांनी संकटाच्या काळात नागरिकांना केलेल्या मदतीचे खासदार तटकरेंनी कौतुक केले तसेच बंद पडलेले मार्ग तातडीने सुरू करून जनजीवन पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर काम करण्याचे सूचित केले.

पावसाळ्यात साथीचे आजार वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमध्ये औषधांचा तुटवडा होऊ देऊ नये, रिक्त पदे भरावीत तसेच रुग्णांना त्यांच्या आवश्यकतेनुसार औषधे व उपचार तत्काळ उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

शेतकऱ्यांना खतांचा तुटवडा भासू नये यासाठी जिल्ह्यात पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. कुंडलिका नदीतील गाळ काढण्याबाबत संबंधित पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी रोह्यात भविष्यात पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी धरणातून होणाऱ्या पाण्याच्या विसर्गाचा स्वतंत्र आढावा घेण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

बैठकीस रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, रोहा पंचायत समिती सभापती विजया पाशिलकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, नगरसेवक-नगरसेविका, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# जिते गावासह हॉटेलमधील नागरिकांची महापुराच्या विळख्यातून सुखरूप सुटका

## ४६ जणांना जीवदान

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अत्यंत प्रतिकूल आणि आव्हानात्मक परिस्थितीत जिल्हा प्रशासनाच्या तत्परतेने आणि बचाव पथकाच्या धाडसाने पेण तालुक्यातील ४६ नागरिकांना महापुराच्या विळख्यातून सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.

मध्यरात्री जिल्हा नियंत्रण कक्षास मिळालेल्या एका संदेशानंतर सुरू झालेले बचावकार्य पहाटेपर्यंत अखंड सुरू राहिले आणि प्रशासनाच्या प्रभावी समन्वयामुळे दोन आव्हानात्मक बचाव मोहिमा यशस्वी ठरल्या.

जिते गावाला पुराच्या पाण्याचा वेढा पडला असून गावातील १६ नागरिक अडकले असल्याचा संदेश जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्षास रात्री २ वाजता प्राप्त झाला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नियंत्रण कक्षाने क्षणाचाही विलंब न करता हा संदेश तहसीलदार तान्हाजी शेजाळ यांना दिला. मध्यरात्रीचा संदेश मिळताच तहसीलदार शेजाळ यांनी तातडीने बचाव यंत्रणा कार्यान्वित केली. आपदा मित्र अभिकेत म्हात्रे, राजेश म्हात्रे, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, तलाठी आणि संबंधित कर्मचाऱ्यांचे पथक घेऊन त्यांनी पहाटेच जिते गावाच्या दिशेने धाव घेतली.

अंधार, मुसळधार पाऊस आणि सर्वत्र पसरलेले पुराचे पाणी अशा कठीण परिस्थितीत बचाव पथकाने जिते गावात पोहोचून मदतीच्या प्रतिक्षेत असलेल्या नागरिकांना धीर दिला. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता बचाव पथकाने अत्यंत धाडसाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने बचावकार्य राबविले. अखेर गावात अडकलेल्या सर्व १६ नागरिकांना पुराच्या विळख्यातून सुखरूप बाहेर काढण्यात पथकाला यश आले.



जिते गावातील नागरिकांची सुटका करून बचाव पथकाने सुटकेचा निःश्वास टाकला न टाकला तोच मुंबई-गोवा महामार्गालगतच्या हॉटेल हिमगौरीला पुराच्या पाण्याचा वेढा पडला असून तेथे ३० व्यक्ती अडकल्याचा आणखी एक तातडीचा संदेश प्राप्त झाला. एका आव्हानात्मक बचाव मोहिमेनंतर क्षणभरही विश्रांती न घेता तहसीलदार तान्हाजी शेजाळ यांच्या नेतृत्वाखालील बचाव पथक पुन्हा नव्या मोहिमेसाठी सज्ज झाले.

### तत्परता आणि कर्तव्यनिष्ठा

*कक्षाने दाखविलेली तत्परता, प्रशासनाने घेतलेले वेगवान निर्णय आणि प्रत्यक्ष घटनास्थळी बचाव पथकाने दाखविलेले धाडस यामुळे ४६ नागरिकांचे प्राण सुरक्षित राहिले. महापुराच्या रौद्ररूपासमोर प्रशासनाची तत्परता आणि आपदा मित्रांचे धाडस भक्कमपणे उभे राहिले. संकट कितीही मोठे असले तरी योग्य समन्वय, तत्पर निर्णय आणि कर्तव्यनिष्ठेच्या बळावर नागरिकांचे जीव वाचविता येतात, याचा प्रत्यय या दोन्ही यशस्वी बचाव मोहिमांनी दिला.*

पथकाने तत्काळ हॉटेल हिमगौरीकडे धाव घेतली. हॉटेलच्या चोहोबाजूंनी पुराचे पाणी असल्याने आत अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढणे अत्यंत कठीण होते, मात्र परिस्थितीसमोर हार न मानता बचाव पथकाने दोरीच्या सहाय्याने सुरक्षित मार्ग तयार केला. पुराच्या पाण्याचा वेढा, पाण्याचा प्रवाह आणि प्रतिकूल हवामानाचा सामना करीत पथकाने अत्यंत संयमाने एकामागून एक अशा सर्व ३० व्यक्तींना सुरक्षितपणे बाहेर काढले. अखेर प्रत्येक नागरिक सुरक्षितस्थळी पोहोचल्यानंतर ही दुसरी बचाव मोहीमही यशस्वी ठरली.

जिते गावातील १६ आणि हॉटेल हिमगौरीमधील ३० अशा एकूण ४६ नागरिकांना महापुराच्या विळख्यातून सुखरूप बाहेर काढण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे व निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदेश शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली पेण उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तान्हाजी शेजाळ, महसूल विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि आपदा मित्र यांच्यातील प्रभावी समन्वयामुळे या दोन्ही बचाव मोहिमा यशस्वी झाल्या.



**खोपोली : येथे सतत पडणाऱ्या पावसामुळे अनेक भागात दरड कोसळण्याचे प्रकार वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी सुभाषनगर व वरची खोपोली येथील भागाला भेट देऊन पाहणी केली आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुरक्षिततेबाबत सूचना केल्या. त्यांच्या समवेत नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.**

# कावजीवाडीतील दुर्घटनाग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात

## जखमींवर तातडीने उपचार; वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठीही कार्यवाही

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यातील निधवली ग्रामपंचायत हद्दीतील कावजीवाडी येथे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत जखमी झालेल्या कातकरी कुटुंबांना प्रशासनाने तातडीने मदतीचा हात दिला आहे. दुर्घटनेतील जखमींवर तत्काळ उपचाराची व्यवस्था करण्यात आली असून संबंधित कुटुंबांना आवश्यक शासकीय मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून कार्यवाही सुरू आहे.



७ जुलै रोजी सकाळी सुमारे ९ वाजता डोंगराचा मलबा कातकरी कुटुंबांच्या घरांवर कोसळल्याने पाच कुटुंबे आपद्ग्रस्त झाली. दुर्घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. या दुर्घटनेत गुलाब दशरथ वाघमारे, अविनाश काशिनाथ वाघमारे, जना काशिनाथ वाघमारे, निर्मला प्रकाश वाघमारे आणि प्रवीण वामन पवार यांच्या कुटुंबांना फटका बसला आहे. या पाच कातकरी कुटुंबांवर अचानक संकट ओढवले असून त्यांच्या घरांचेही नुकसान झाले आहे.

दुर्घटनेत जखमी झालेल्या व्यक्तींना रायगड जिल्हा परिषद शाळा, कावजी येथे तात्पुरता आसरा देण्यात आला आहे. त्यांच्या तातडीच्या उपचाराची व्यवस्था प्रशासनाकडून करण्यात आली आहे. आपद्ग्रस्त कुटुंबांना आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांना निर्देश देण्यात आले आहेत.

दुर्घटनेनंतर परिसरातील वीजपुरवठ्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेतील विद्युत मीटर बसविण्याचे काम पूर्ण झाले असले, तरी विद्युत जोडणी झालेली नसल्याने वीजपुरवठा उपलब्ध नव्हता. याबाबत अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, रायगड यांच्याशी संपर्क साधून तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्या माध्यमातून विद्युत सुविधेसाठी दोन सौर दिवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत तसेच आठ दिवस पुरेल इतका धान्यसाठाही आपद्ग्रस्तांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

दरम्यान, दुर्घटनाग्रस्त कुटुंबांच्या परिस्थितीची पाहणी केल्यानंतर काही महत्त्वाचे सामाजिक प्रश्नही प्रशासनाच्या निदर्शनास आले. कुमार हरेश महादू वीर (वय १२), याचे आधारकार्ड नसल्याचे, तर कुमारी रेवता महादू वीर (वय ३०) आणि दोन्ही पायांनी दिव्यांग असलेल्या सानिया महादू वीर (वय ३९) यांची नावे मतदार यादीत नसल्याचे आढळून आले. संबंधित बाबींवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दिव्यांग व्यक्तीकडे दिव्यांग प्रमाणपत्र अथवा युडीआयडी कार्ड नसल्यास आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून ते मिळवून देण्याबाबतही ग्रामसेवक व तलाठी यांना सूचना देण्यात आल्या आहेत. आपद्ग्रस्त कुटुंबांना केवळ तात्पुरती मदत न देता त्यांना विविध शासकीय योजनांच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनाकडून समन्वयाने कार्यवाही करण्यात येत आहे.

# मनोज जाधव यांना कृषी सेवारत्न पुरस्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी सहायक अधिकारी तथा मंत्री भरत गोगावले यांचे स्वीय सहाय्यक मनोज जाधव यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.




राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत जाधव यांनी सपत्नीक पुस्कार स्वीकारला.

कृषी सहायक अधिकारी जाधव यांनी सर्व शेतकऱ्यांना तसेच त्यांच्या अथक कष्टांच्या सन्मानार्थ आणि सेवेसाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार समर्पित करीत असल्याचे कृतार्थ भावनेने सांगितले.

# अर्जेंटिनाचा इजिप्तवर थरारक विजय



**अटलांटा : वृत्तसंस्था**

लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिना संघाने विश्वचषकाच्या बाद फेरीत इजिप्तविरुद्ध एका अटीतटीच्या सामन्यात ३-२ असा अविश्वसनीय विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. निर्धारित वेळेत २-०ने पिछाडीवर असताना अर्जेंटिनाने अखेरच्या मिनिटांत दमदार पुनरागमन करत चाहत्यांना एक अविस्मरणीय सामना अनुभवायला दिला.

## उपांत्यपूर्व फेरीत दाखल

सामन्याच्या सुरुवातीपासूनच इजिप्तने आक्रमक पवित्रा घेत अर्जेंटिनावर दबाव निर्माण केला होता. १५व्या मिनिटाला यासर इब्राहिम याने गोल करत इजिप्तला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ६७ व्या मिनिटाला मुस्तफा झिको याने गोल करत ही आघाडी २-० वर नेली. एक वेळ अशी आली होती की, गतविजेत्या अर्जेंटिनाचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात येईल असे वाटत होते, मात्र अर्जेंटिनाने आपल्या जिद्दीच्या जोरावर सामन्याचे चित्र पालटले.

सामना संपायला काही मिनिटे शिल्लक असताना अर्जेंटिनाने आक्रमणात गती वाढवली. ७९व्या मिनिटाला: क्रिस्टियन रोमेरोने हेडरद्वारे गोल करत खाते उघडले. ८३ व्या मिनिटाला लिओनेल मेस्सीने स्पर्धेतील आपला आठवा आणि विश्वचषकातील कारकिर्दीतील २१वा गोल करत धावसंख्या २-२ अशी बरोबरीत आणली. मग एन्झो फर्नांडिसने विजयी गोल करत अर्जेंटिनाचा ३-२ने विजय निश्चित केला.

आता उपांत्यपूर्व फेरीत अर्जेंटिनाचा सामना शनिवारी मिसूरीमधील कॅन्सस सिटी येथे स्वित्झर्लंडविरुद्ध होणार आहे. गतविजेतेपद राखण्याच्या जिद्दीने मैदानात उतरलेल्या अर्जेंटिनासाठी हा सामना अत्यंत महत्त्वाचा असणार आहे.

## ईव्यान गुप्ताला नेमबाजीत कांस्यपदक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

२९व्या एस.जे. इझेकियल मेमोरियल चॅम्पियनशिप महाराष्ट्र रायफल संघटना आयोजित शॉटगन नेमबाजीत ईव्यान गुप्ता याने रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत कांस्यपदक मिळवले. त्याची ऑल इंडिया शॉटगन शुटींग स्पर्धेकरिता निवड झाली.




या यशाबद्दल रायफल व पिस्तूल शूटिंग क्लब रायगडचे अध्यक्ष विजय खारकर, सेक्रेटरी व प्रशिक्षक राष्ट्रीय नेमबाज किशन खारके, खजिनदार प्रितम पाटील, महेश फुलोरे, अजिंक्य चौधरी, प्रशिक्षक अलंकार कोळी, समाधान घोपरकर, सुरज थळे, किरण माळी, सुनील मढवी तसेच आंतरराष्ट्रीय कोच रालस्टन कोयलो यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विम्बल्डनमध्ये जोकोविचची सेमीफायनलमध्ये धडक

**लंडन : वृत्तसंस्था**

३९ वर्षीय टेनिस स्टार नोव्हाक जोकोविचने विम्बल्डनच्या उपांत्यपूर्व फेरीत एक ऐतिहासिक आणि थरारक विजय मिळवला आहे. पाच तास आणि १५ मिनिटे चाललेल्या या मॅरेथॉन सामन्यात जोकोविचने फेलिक्स ऑगर-अलियासिमचा ७-६(१०), ३-६, ६-३, ६-७(४), ७-६(४) अशा फरकाने पराभव केला. विम्बल्डनच्या इतिहासातील ही सर्वात लांब उपांत्यपूर्व फेरी ठरली.

अतिशय दमछाक करणाऱ्या या सामन्यात दोन्ही खेळाडूंनी अटीतटीचा खेळ केला. पाचव्या सेटच्या सुपर टायब्रेकरमध्ये जोकोविचने आपला अनुभव पणाला लावत ऑगर-अलियासिमला मात दिली. या विजयासह जोकोविचने सलग आठव्यांदा विम्बल्डनच्या उपांत्य फेरीत प्रवेश करण्याचा विक्रम नोंदवला आहे, जो रॉजर फेडररच्या विक्रमापेक्षाही सरस आहे.



सामन्यादरम्यान जोकोविचला पायाच्या दुखापतीमुळे वैद्यकीय विश्रांती घ्यावी लागली होती. तणावाच्या क्षणीही तो मैदानात सक्रिय होता. सामन्यानंतर जोकोविच म्हणाला, माझ्यापेक्षा १५ वर्षांनी लहान असलेल्या तरुण खेळाडूंशी मी आजही लढू शकतो आणि त्यांना हरवू शकतो, हे माझ्यासाठी सुखद आश्चर्य आहे.

### आता सिनरशी गाठ

आता शुक्रवारी होणाऱ्या उपांत्य फेरीत जोकोविचचा सामना गतविजेता जॅनिक सिनरशी होणार आहे. सिनरने जॅन-लेनार्ड स्ट्रफचा सरळ सेट्समध्ये पराभव करून या फेरीत स्थान मिळवले आहे. मागील वर्षी सिनरने जोकोविचला विम्बल्डनमध्ये हरवले होते. त्यामुळे आता होणारा सामना अधिक चुरशीचा असणार आहे.

दरम्यान, महिला एकेरीत कोको गॉफने जेसिका पेगुलावर ४-६, ६-३, ६-३ असा विजय मिळवत पहिल्यांदाच विम्बल्डनच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आता अंतिम फेरीसाठी तिचा सामना कॅरोलिना मुचोव्हाशी होणार आहे.

# स्वित्झर्लंड उपांत्यपूर्व फेरीत; कोलंबियाचा पराभव

**व्हँकूवर : वृत्तसंस्था**

स्वित्झर्लंडने पेनल्टी शूटआऊटमध्ये कोलंबियावर ४-३ अशी मात करत फिफा विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे. निर्धारित आणि अतिरिक्त वेळ गोलशून्य बरोबरीत संपल्यानंतर रुबेन व्हार्गासने निर्णायक पेनल्टी गोल करत स्विस संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. या विजयासह स्वित्झर्लंडने १९५४नंतर प्रथमच विश्वचषकाच्या अंतिम आठ संघांमध्ये स्थान मिळवले आहे.



५२,४९७ प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या बीसी प्लेस स्टेडियममध्ये हा सामना झाला. कोलंबियाच्या समर्थकांचा मोठा पाठिंबा असतानाही स्विस संघाने आपल्या शिस्तबद्ध खेळाच्या जोरावर संयम राखला.

दोन्ही संघांनी गोल करण्यासाठी जोरदार प्रयत्न केले, मात्र दोन्ही बाजूंचे गोलरक्षक अभेद्य राहिले. ३०व्या मिनिटाला फॅबियन रायडरचा प्रयत्न कोलंबियाचा गोलरक्षक कॅमिलो व्हार्गासने, तर ५२व्या मिनिटाला गुस्तावो पुएर्टाचा शॉट स्विस गोलरक्षक ग्रेगर कोबेलने प्रभावीपणे रोखला.

पेनल्टी शूटआऊटमध्ये स्वित्झर्लंडने मानसिक दृढता दाखवली. कोलंबियाचा बचावपटू डेव्हिन्सन सांचेझचा प्रयत्न क्रॉसबारला लागला, तर स्विस गोलरक्षक ग्रेगर कोबेलने कुचो हर्नांडेझचा गोल वाचवून आपल्या संघाचा विजय निश्चित केला.

या विजयानंतर आता स्वित्झर्लंडचा सामना शनिवारी (दि. ११) मिसूरीमधील कॅन्सस सिटी येथील ॲरोहेड स्टेडियमवर गतविजेत्या अर्जेंटिनाशी होणार आहे. मंगळवारी झालेल्या पहिल्या सामन्यात अर्जेंटिनाने इजिप्तचा ३-२ने पराभव करून आधीच उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. स्वित्झर्लंड आणि अर्जेंटिना यांच्यातील हा सामना आता या स्पर्धेतील सर्वात महत्त्वाचा मुकाबला मानला जात आहे.

# भारताचा टी-२० इतिहासातील सर्वांत मोठा पराभव



**नॉटिंगहॅम : वृत्तसंस्था**

गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाला इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात मोठा धक्का बसला. नॉटिंगहॅम येथे झालेल्या या सामन्यात इंग्लंडने भारताचा तब्बल १२५ धावांनी पराभव करत मालिकेत २-० अशी आघाडी घेतली.

हा पराभव भारताच्या टी-२० इतिहासातील धावांच्या फरकाने झालेला सर्वात मोठा पराभव ठरला. यापूर्वी २०१९मध्ये न्यूझीलंडविरुद्ध भारताला ८० धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. आता तो विक्रम मोडला गेला आहे.

### इंग्लंडची मालिकेत २-०ने आघाडी

प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने निर्धारित २० षटकांत ७ बाद २०१ धावा उभारल्या. सलामीवीर फिल सॉल्ट याने ४४ चेंडूत ७० धावांची दमदार खेळी करत भारतासमोर २०२ धावांचे आव्हान ठेवले.

या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजी पूर्णपणे कोलमडली. वैभव सूर्यवंशी आणि इशान किशन यांनी संयुक्तरीत्या सर्वाधिक १३ धावा केल्या. इंग्लंडच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत भारताचा संपूर्ण संघ अवघ्या ७६ धावांत गुंडाळला.

या पराभवासह भारताला सलग पाच टी-२० सामन्यांमध्ये विजय मिळवण्यात अपयश आले आहे. भारतीय संघाच्या फलंदाजीबाबत तसेच संघाच्या कामगिरीबाबत आता गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# अमेरिका-बोस्निया सामन्याने मोडले सर्व विक्रम

### प्रेक्षकसंख्येचा नवा उच्चांक



**वॉशिंग्टन : वृत्तसंस्था**

अमेरिकेचा बोस्निया-हर्झेगोविनाविरुद्धचा सामना प्रेक्षकसंख्येच्या बाबतीत ऐतिहासिक ठरला आहे. या सामन्याने अमेरिकेतील इंग्रजी आणि स्पॅनिश अशा दोन्ही भाषांमधील फुटबॉल सामन्यांच्या प्रेक्षकसंख्येचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत.

फॉक्स नेटवर्कच्या माहितीनुसार हा सामना तब्बल २६.४ दशलक्ष लोकांनी पाहिला, जो देशाच्या इतिहासातील सर्वाधिक पाहिला गेलेला 'इंग्रजी भाषेतील' फुटबॉल सामना ठरला आहे.

टेलेमुंडोवरील प्रसारणानेही विक्रम प्रस्थापित केला असून ९८ लाख प्रेक्षकांनी हा सामना पाहिला. हे प्रमाण अमेरिका आणि तुर्की यांच्यातील मागील विक्रमी सामन्यापेक्षा ३३ टक्यांनी अधिक आहे.

फॉक्सच्या प्रसारणादरम्यान रात्री ९:४५ ते १० (ईडीटी) या वेळेत प्रेक्षकसंख्येने ३४.८ दशलक्षांचा उच्चांक गाठला होता.

८ फेब्रुवारी रोजी झालेल्या सुपर बाउल सामन्यानंतर, कोणत्याही टीव्ही नेटवर्कवर पाहिलेला हा अमेरिकेतील सर्वाधिक प्रेक्षकसंख्येचा कार्यक्रम ठरला आहे. तुलनात्मकदृष्ट्या एनबीए फायनल्सच्या पाचव्या सामन्याला सरासरी २४.५ दशलक्ष प्रेक्षक लाभले होते, त्या तुलनेत या फुटबॉल सामन्याला मिळालेला प्रतिसाद प्रचंड मोठा आहे.

या सामन्यासाठी कॅन्सस सिटी (मिसूरी), बोस्टन, सेंट लुईस, सॅन फ्रान्सिस्को आणि ऑस्टिन (टेक्सास) या शहरांमध्ये सर्वाधिक प्रेक्षकवर्ग दिसून आला.

## फिफा वर्ल्डकपमध्ये आता क्वार्टर फायनलचा थरार!

**मेक्सिको सिटी : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. या स्पर्धेतील क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश करणारे आठही संघ ठरले आहेत. त्यांचा थरार रंगेल.

या स्पर्धेतील राउंड ऑफ १६ फेरीतील सर्व सामने पूर्ण झाले असून आता टॉप आठ संघ ठरले आहेत, जे या स्पर्धेतील क्वार्टर फायनलचा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहेत. या आठ संघांमध्ये अर्जेंटिना, फ्रान्स, स्वित्झर्लंड, स्पेन, बेल्जियम, नॉर्वे, मोरक्को आणि इंग्लंड या संघांचा समावेश आहे. यापैकी चार संघ पुढे सेमी फायनलचा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरतील.

उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्स विरुद्ध मोरोक्को सामना १० जुलै रोजी रात्री १.३० वाजता, स्पेन विरुद्ध बेल्जियम लढत ११ जुलैला रात्री १२.३० वाजता, इंग्लंड विरुद्ध नॉर्वे १२ जुलै रात्री २.३० वाजता, तर अर्जेंटिना विरुद्ध स्वित्झर्लंड सामना १२ जुलैला सकाळी ६.३० वाजता खेळला जाणार आहे.

# टीम इंडियाच्या नावावर लाजिरवाण्या विक्रमांची नोंद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाच्या टी-२० पर्वाची सुरुवात निराशजन झाली आहे. पाच सामन्यानंतर अद्याप संघ एकही सामना जिंकू शकलेला नाही. नॉटिंगहॅम येथील ट्रेंट ब्रिजच्या मैदानातील तिसऱ्या टी-२० सामन्यात मोठ्या पराभवासह भारतीय संघाच्या नावे अनेक लाजिरवाण्या विक्रमांची नोंद झाली आहे.

सलग दोन वेळच्या टी-२० चॅम्पियन असलेल्या टीम इंडियाला इंग्लंडविरुद्ध १२५ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. टी-२० इतिहासातील भारतीय संघाचा हा सर्वात मोठा पराभव ठरला. याआधी २०१९मध्ये न्यूझीलंडविरुद्ध टीम इंडियाला ८० धावांनी पराभवाची नामुष्की ओढावली होती.

इंग्लंडच्या संघाने दिलेल्या २०२ धावांचा पाठलाग करताना भारतीय संघ अवघ्या ७६ धावांत गारद झाला. ही भारतीय संघाची टी-२० इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाची निच्चांकी धावसंख्या ठरली. २००८मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध टीम इंडिया ७४ धावांत ऑलआउट झाली होती.



पॉवर प्लेमध्ये टीम इंडियाने ५२ धावांवर पाच विकेट्स गमावल्या. टी-२० क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच पहिल्या सहा षटकात टीम इंडियाचा अर्धा संघ तंबूत परतल्याचे पाहायला मिळाले.

टीम इंडियाने मागील पाच टी-२० सामन्यांत एकही विजय मिळवलेला नाही. एका सामन्याचा निकाल पावसामुळे लागला नव्हता, तर उर्वरित चार सामन्यांत भारताला पराभव पत्करावा लागला. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताच्या इतिहासात प्रथमच अशी वेळ आली आहे.

## विंडीजचा लंकेवर मालिका विजय

**अँटिग्वा : वृत्तसंस्था**

दुसरी टेस्ट अनिर्णित राखत वेस्ट इंडिजने तब्बल २३ वर्षांनंतर श्रीलंकेविरुद्ध कसोटी मालिका जिंकण्याचा पराक्रम केला. दुखापतींमुळे श्रीलंकेचे चार प्रमुख खेळाडू या कसोटीत खेळू शकले नाहीत, मात्र नव्या खेळाडूंनी गड सांभाळला.

२००३मध्ये वेस्ट इंडिजने दोन सामन्यांची मालिका १-० अशी जिंकली होती. त्यानंतर श्रीलंकेने मालिका जिंकली. दोन मालिका अनिर्णित राहिल्या. २०१५मध्ये श्रीलंकेने पुन्हा बाजी मारली. २०१८मधली मालिका अनिर्णित झाली. २०११मध्येही मालिकेचा निर्णय अनिर्णित असाच राहिला. त्याच वर्षी श्रीलंकेने सरशी साधली. प्रदीर्घ काळानंतर वेस्ट इंडिजने श्रीलंकेविरुद्ध मालिका विजयाचा आनंद साजरा केला. जस्टीन ग्रीव्हजला सामनावीर तसेच मालिकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

# फिफा वर्ल्डकपच्या तिकीट दरात घसरण

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीला सुरुवात होण्यापूर्वी सामन्यांच्या तिकिटांच्या दरात लक्षणीय घट झाली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे अमेरिका आणि पोर्तुगाल हे संघ स्पर्धेतून बाहेर पडले आहेत. रोनाल्डोच्या बाहेर पडण्यामुळे तिकिटांची मागणीही कमी झाली आहे. आता उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्स आणि मोरोक्को, स्पेन आणि बेल्जियम, नॉर्वे आणि इंग्लंड, तसेच अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंड यांच्यात सामने पाहायला मिळणार आहेत.

फुटबॉल विश्वचषक आता महत्त्वाच्या टप्प्यावर पोहचला आहे. उपांत्यपूर्व फेरीचे सामने या आठवड्यात सुरू होणार आहेत, पण त्याआधी फुटबॉल चाहत्यांसाठी एक मोठी बातमी आहे. स्पर्धेतील सर्वात मोठ्या बाद फेरीच्या सामन्यांपैकी एका सामन्याची तिकिटे आता पूर्वीपेक्षा खूपच स्वस्त झाली आहेत.



टिकपिक या दुय्यम तिकीट विक्री प्लॅटफॉर्मनुसार स्पेन आणि बेल्जियम यांच्यातील शुक्रवारच्या उपांत्यपूर्व सामन्याच्या सर्वात स्वस्त तिकिटाच्या दरात मोठी घट झाली आहे. पूर्वी तिकिटांची किंमत सुमारे २,९५० डॉलर होती, पण आता सुरुवातीची किंमत सुमारे १,२०० डॉलरपर्यंत खाली आली आहे. ही तिकिटांच्या दरात जवळपास ६० टक्के कपात आहे.

या घसरणीचे सर्वात मोठे कारण अमेरिकेचे स्पर्धेतून बाहेर पडणे हे मानले जाते. अमेरिका फिफा विश्वचषकाचा सह-यजमान देश आहे. उपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमने अमेरिकेला ४-१ने पराभूत करून स्पर्धेतून बाहेर काढले. जर अमेरिका उपांत्यपूर्व फेरीत पोहचली असती, तर देशांतर्गत चाहत्यांच्या प्रचंड मागणीमुळे तिकिटांच्या किमती आणखी वाढल्या असत्या.

तिकिटांच्या दरात घट होण्याचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे पोर्तुगालचे स्पर्धेतून बाहेर पडणे आहे. स्पेनने पोर्तुगालला १-०ने हरवून स्पर्धेतून बाहेर काढले. या पराभवाने फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डोच्या फिफा विश्वचषक कारकिर्दीचा शेवट झाला. रोनाल्डो जगातील सर्वात लोकप्रिय खेळाडूंपैकी एक मानला जातो, त्यामुळे त्याच्या स्पर्धेतून बाहेर पडण्याचा तिकिटांच्या मागणीवर मोठा परिणाम झाला आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com